सकाळ

# स्त्रीदास्याचा हुंकार : झोका

**डॉ. रजनी लुंगसे यांचा 'झोका' कवितासंग्रह जळगावच्या 'प्रशांत पब्लिकेशन'ने प्रकाशित केला आहे. संग्रहात ५१ स्त्रियांच्या जीवनासंदर्भातील कवितांचा समावेश आहे. संग्रहातील कवितेतील भाषा साधी, सरळ, सोपी अन् ओघवती आहे. पण, काळजाला भिडणारी आहे. तसेच प्रत्येक स्त्रीला समाजक्रांतीच्या निरनिराळ्या वाटा दाखविणाराही आहे.**

पुस्तक परिचय

प्रा. डॉ. सतीश मस्के



ताराबाई शिंदेंसारख्या लेखिकेने 'स्त्री- पुरुष तुलना' ग्रंथ लिहून स्त्रियांचे दुःख हलवून पुरुषी वर्चस्वाला व विषम व्यवस्थेला जबरदस्त हादरा दिला. स्त्री शोषणाविरुद्ध लढा देणाऱ्या त्या बंडखोर लेखिका होत्या; त्याचप्रमाणे डॉ. लुंगसे यांनी पाच पेराच्या भागात कवितांची विभागणी केली असून, स्त्रियांच्या जीवनाचे नानाविध कंगोरे, त्यांची दुःखे, वेदना, समस्या, व्यथा आणि जाणिवा मांडल्या आहेत. पेरा एकमध्ये स्त्री जाणिवांच्या कविता, पेरा दोनमध्ये वेदनेचा हुंकार, पेरा तीनमध्ये परिवर्तनवादी, पेरा चारमध्ये मातृत्व, भ्रूणहत्या आणि पेरा पाचमध्ये संकीर्ण (इतर), अशा विषयांवरील कवितांचा समावेश करून स्त्रियांची दुःखे, बंदिस्त जीवन, स्त्रियांचे शोषण, स्त्रियांचे पारतंत्र्य मांडले आहे.

समाजजीवनात स्त्रीचे स्थान काय? तिचे अस्तित्व काय? तिला कसे वेगवेगळ्या धर्मव्यवस्थेच्या नियमात बंदिस्त केले जाते? मनुस्मृती ग्रंथाने आणि देवाच्या नावाने तिचे अस्तित्व कसे संपविले जात आहे? याविषयीच्या वेदनाही कवयित्रीने कवितांमध्ये मांडल्या आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत स्त्री म्हणून भोगावी लागणारी दुःखेही मांडली आहेत. आजही पुरुषांची संकुचित असणारी मानसिकता; त्याचबरोबर शिक्षण घेऊनही मध्ययुगीन विचारधारेने वागणारी स्त्री, त्यामुळे प्रश्न कसे निर्माण होतात आणि बिकट होत जातात, याचा प्रत्ययही कविता वाचताना येतो.




डॉ. लुंगसे यांनी 'झोका' कवितासंग्रहात स्त्रियांच्या दुःखाचे नानाविध पदर उलगडून दाखविले आहेत. डॉ. लुंगसे यांच्या संग्रहातील कवितेतील भाषा साधी, सरळ, सोपी अन् ओघवती आहे. पण, काळजाला भिडणारी आहे. दुःखाची जाणीव करून देऊन लढाऊ बाणा निर्माण करणाऱ्या स्त्रियांनी आता परिवर्तनासाठी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने झपाटायला हवे, असा आशावाद कवयित्री व्यक्त करताना दिसतात. त्यामुळे हा कवितासंग्रह वाचनीय तर झालाच आहे. पण, प्रत्येक स्त्रीला समाजक्रांतीच्या निरनिराळ्या वाटा दाखविणाराही आहे. आजच्या युगात मरगळ आलेल्या स्त्रियांनाही नवसंजीवनी देऊन परिवर्तनाच्या लढ्यात उतरवायला भाग पाडणारे विचार यामध्ये वाचावयास मिळतात. एकंदरीत डॉ. लुंगसे यांचा 'झोका' कवितासंग्रह निश्चितच अनेक स्त्रियांना स्त्री अस्तित्वाची जाणीव करून देणारा आहे. पुढील वाटचालीसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**'झोका'**
**लेखिका डॉ. रजनी लुंगसे**
**प्रकाशन : प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव**
**पृष्ठे : ९२, मूल्य : १५० रुपये**

सकाळ

# डॉ. आंबेडकर यांचे स्त्रियांसाठीचे योगदान!

तो काळ असा होता, की स्त्रियांना मानवी हक्कापासून, शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांचा मानसिक, शारीरिकसह आर्थिक बाजूने छळ केला जायचा. त्यामुळे स्त्रियांच्या जीवनात कुठलीच प्रगती दिसून येत नव्हती, हे जाणत डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या उन्नती-विकासासाठी पुढे आले, झटले...

महापुरुषांचे कार्य

प्रा. डॉ. सतीश मस्के








समाजाचा अर्धा भाग स्त्री आहे. पुरुषांप्रमाणेच ती समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. तिचा विकास झाल्याशिवाय कुटुंबाचा विकास शक्य नाही. स्त्रीवर कुटुंब अवलंबून असते. म्हणून तिचा बहुअंगांनी विकास व्हायला हवा. ती स्वावलंबी म्हणजे स्वतःच्या पायावर उभी राहायला हवी. 'चूल आणि मूल' एवढे क्षेत्र मर्यादित असू शकत नाही. जात- धर्म, रूढी- परंपरा, कर्मकांड अशा अनेक जाचक गोष्टींना झुगारून जीवनाच्या विविध क्षेत्रांत तिने जायला हवे, अशा व्यापक स्वरूपाचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर करीत होते. म्हणूनच त्यांनी २५ डिसेंबर १९२७ ला महाड येथे मनुस्मृतीचे दहन करून स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या अवनतीविषयी सखोल अभ्यास केला होता. महात्मा फुले, सावित्रीबाई फुलेंप्रमाणेच त्यांनी स्त्रियांची ही अवस्था केवळ शिक्षण नसल्यामुळे झाली आहे, हे ओळखले होते. १९१६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्र विभागाच्या अभ्यासमंडळासमोर 'भारतातील जाती' हा स्त्रियांच्या प्रश्नांसंदर्भातील निबंध सादर केला होता. जाती-जातींतील विवाह, बालविवाह, जरठ- कुमारी विवाह, सती प्रथा आदींचे निष्कर्ष मांडून निबंधातून स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे त्यांनी कार्य केले. १९५२ मध्ये 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' या निबंधातूनही त्यांनी भारतातील स्त्रिया, स्त्रियांच्या उन्नतीवर व अवनतीवर परखड भाष्य केले. केवळ स्त्रियांच्या उन्नतीसाठी असणाऱ्या हिंदू कोड बिलासाठी त्यांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला. संविधानाद्वारेही त्यांनी स्त्रीला समान हक्क बहाल केले आहेत. तेव्हा आजच्या स्त्रियांनी भारतीय संविधानाचा आधार घेऊन, सक्षम बनून संकटांना, समस्यांना वेळच्या वेळीच सामोरे जायला हवे. आपल्या न्याय्यहक्कांसाठी आणि अन्याय- अत्याचाराविरुद्ध लढायला शिकले पाहिजे.

सकाळ

# जगण्यातील खदखद : आसवांचे हार झाले

**गझल म्हटले, की त्यामध्ये प्रेमाचा भाव येतो. जीवन जगायला प्रेरणा, प्रोत्साहन आणि बळ देण्यासाठी गझल नेहमीच माणसाला बळकट करीत आली आहे, जीवनात चैतन्य निर्माण करीत आली आहे. 'आसवांचे हार झाले' या रमेश सरकाटे यांच्या गझलसंग्रहात समाजातील दीन-दलित, शोषित स्त्रिया अन् शेतकरी यांचे जीवन मोतीहाराप्रमाणे मान-सन्मान अन् प्रतिष्ठेचे झाले आहे. एकंदरीत या संग्रहातील सर्वच गझल वाचकांना प्रेरणा अन् प्रोत्साहन बळ देणाऱ्या आहेत.**

पुस्तक परिचय

प्रा. डॉ. [illegible]



'आसवांचे हार झाले' हा गझलसंग्रह रमेश शिवाजी सरकाटे यांचा आहे. रमेश सरकाटे हे [illegible] येथील [illegible] नोकरी [illegible] झाले आहेत. महाविद्यालयीन जीवनापासून साहित्याची आवड असल्यामुळे कवितालेखन, गझल व कादंबरी लेखन त्यांनी केले आहे. 'गर्जना' (गझलसंग्रह), 'आसवांचे हार झाले' (गझलसंग्रह), '[illegible]' (संकलित); त्याचबरोबर 'आय. पी. एस.' (कादंबरी) त्यांच्या नावावर आहे. रमेश सरकाटे हे पोलिस [illegible] अधिकारी जरी असले, तरी त्यांचे मन हे संवेदनशील आहे. समाजातील दीन-दलित, शोषित स्त्रिया आणि शेतकरी यांच्या वेदनेमुळे [illegible]


जीवन दयनीय झाले होते, अवमानजीवन झाले होते; परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या [illegible] त्यांच्या जीवनाला, जगण्याला एक अभूतपूर्व [illegible] आणली. म्हणूनच त्यांचे जीवन मोतीहाराप्रमाणे मान-सन्मान आणि प्रतिष्ठेचे झाले. म्हणून रमेश सरकाटे यांनी त्यांच्या गझलसंग्रहाला समर्पक 'आसवांचे हार झाले' हे नाव दिले.

जळगावच्या अथर्व पब्लिकेशन्सने प्रकाशित केलेल्या 'आसवांचे हार झाले' या संग्रहात ९८ गझलांचा समावेश आहे. यामध्ये उर्दू, हिंदी, मराठी गझल आहेत. प्रेमाच्या शब्दांच्या माध्यमातून शेराच्या माध्यमातून गझल मानवी जीवन फुलविण्याचा, बहरण्याचा प्रयत्न करीत आली आहे. ए. के. शेख (पनवेल) यांनी लिहिलेली प्रस्तावना हे त्यांच्या गझलेचे फलित आहे; तर सुप्रसिद्ध गझलकार भीमराव पांचाळे यांनी केलेली पाठराखण त्यांच्या गझलेचे सामर्थ्य आहे. एकंदरीत या संग्रहातील सर्वच गझल या वाचकांना प्रेरणा व प्रोत्साहन बळ देणाऱ्या आहेत.

**कवी रमेश सरकाटे**

गझलसंग्रह : 'आसवांचे हार झाले'
प्रकाशन : अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव
पृष्ठे : ११०, मूल्य : १२५ रुपये

**(लेखक पिंपळनेर येथील कर्मवीर आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत.)**




'आसवांचे हार झाले' या गझलसंग्रहाचे मुखपृष्ठ.

वृत्तरत्न
# सम्राट
संपादक : बबन कांबळे
₹4/-

# धम्म, धर्म व पुरोगामित्व



डॉ. मनीष [illegible]

लोकमत

# आम्ही बी माणसं आहोत....!

## प्रेम आणि मानवतेचा धर्म जागवायला हवा...

सहज सुचलं म्हणून



प्रा. डॉ. सतीश मस्के,
पिंपळनेर.

रस्त्याने जाता-जाता भांडे घासणाऱ्या एक मावशी भेटल्या. थांबलो अन् त्यांना विचारले'काय चाललंय मावशी'

'काही नाही, काम करून घरी जातेय सर.'

'इतक्या उशिरा'

'हो मग काय करावे सर, आता कामे वाढली आहेत.'

'प्रत्येकाच्या घरी बाहेर शिकायला गेलेली मुलं कोरोनामुळे घरी आली आहेत. त्यो मोठा आजार आलाय म्हणं. त्यांना सुट्या दिल्या आहेत.'

'मी हसत-हसत म्हणालो, तुम्हाला नाहीत सुट्या.'

'आम्हाला कशाच्या आल्यात सुट्या... आम्हा गरिबाचं काय खरं हाय...आम्ही कुणाच्या मापात नाहीत. आमचं हातावर पोट हाय. काम केलं तर खायला मिळतंय. आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन नोकरदार माणसांचा वेगळाच आहे. खरं तर उलट मला आता जास्त काम लागत आहे. कपडे, भांडे जास्तीचे धुवावे लागत आहेत. म्हणून घरी जायला ह्यो टाइम झाला आहे. आम्ही काम केलं तरच पोटाला मिळणार आहे. आमच्या मुलाबाळांना खायला मिळणार आहे. आमचा न सरकार न कोण बी विचार करीत नाही वो सर.'

'हो मावशी, तुमचं म्हणणं सारं खरं आहे; पण कोरोना नावाचा महाभयंकर आजार आला आहे.'

'हो सर, तुमचं म्हणणं अगदी रास्त आहे. तुम्हाला तरी सरकारने सुट्या दिल्या आहेत. सरकार पगार देईन; पण आमच्यासारख्या गरिबांचे काय? बेहाल आहेत. आमच्याकडे लोक कामगार म्हणून बघतात. आमच्या भावना, दुःख, व्यथा, वेदना याचं काहीच कुणाला देणं-घेणं नाही. काय करावे, कुणाला सांगावे? नशिबाचे भोग आहेत सारे.'

'हो, तुमचे म्हणणे बरोबर आहे... मावशी; पण तुम्ही कोरोनापासून बचाव करा. सगळ्यांची काळजी घ्या.'

'हो, पण कशाची आली काळजी, हल्ली माणसं माणसासारखी वागत नाहीत. पहिला जमाना आता राहिला नाही. पहिल्या काळासारखी माणसं माणुसकीची राहिली नाहीत. बाई घरकामाला लावली म्हणजे तिच्याकडून किती काम करून घ्यावं हे नोकरदार, पैशावाल्या, पगारदार माणसांना समजतच नाही... काय करावं, काम केल्याशिवाय गत्यंतर नाही.'

'हो मावशी, माणसं आता पहिल्यासारखी राहिली नाहीत. माणुसकी विसरत चालली आहेत. कोणाला कोणाचं देणं-घेणं राहिलेलं नाही. तरीही तुम्ही कोरोनापासून सावध राहा. तुमची, तुमच्या घरच्यांची काळजी घ्या. येतो.'

'हो ठीक आहे, काळजी घेतो; पण आम्ही कामगार माणसं, कामावाली माणसं.'आम्ही बी माणसं आहोत' हे मात्र आजची हल्लीची माणसं विसरत चालली आहेत.

खरे तर त्या मावशीचे बोलणे ऐकून समाजातील मानवता हरवत चालली आहे असेच चित्र दिसत आहे. म्हणून वेळप्रसंगी माणसाने माणसाला समजून घेऊन माणुसकीने वागणे महत्त्वाचे आहे. कोरोनाने खूप काही शिकविले आहे हे प्रत्येकाने ध्यानात घ्यायला हवे. माणूस म्हणून जगायला शिकले पाहिजे. स्वार्थ, अहंकार, मोठेपणा, जात, धर्म बाजूला फेकला पाहिजे. प्रेम आणि मानवतेचा धर्म जागवायला हवा.

8:22
Done





# वैद्यकीय व्यवसायातील भाषा





डॉ. शेख इकबाल मिंडे

# समृद्ध मराठी बोली





प्रा. हनुमान ...

# भाषा आणि संस्कृती





डॉ. सतीश ...

मा. मुख्यमंत्री श्री. उद्धवजी ठाकरे साहेब
यांना ६१ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



- शुभेच्छुक -
Abhitech Energycon Ltd, Mumbai

मा. मुख्यमंत्री श्री. उद्धवजी ठाकरे साहेब
यांना ६१ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!



- शुभेच्छुक -
Vishal Waindeskar (MD),
OZONE Research & Applications (I) Pvt. Ltd., Nagpur

लोकमत

# माणसानं कसं माणसासारखं वागावं

## माणसाच्या जीवनाला सुंदर, संपन्न आणि सुखी बनवणं हेच या मूल्याचे कार्य असते

सहज सुचलं म्हणून...

मा



प्रा. डॉ. सतीश मस्के,
साक्री.

सकाळी सकाळी साडे आठ ते नऊच्या सुमारास प्रकाश गाडीवरून जात होता. घराच्या बाहेर पडल्यावर काही अंतरावर त्याला नागेशचे मामा पायी जाताना दिसले. प्रकाशनं गाडी त्यांच्याजवळ थांबवली व त्या मामांना विचारले, 'कुठे निघालात मामा सकाळी सकाळी?' 'स्टॅन्डकडे निघालोय' 'नागेश घरी नाही का?' 'आहे की...' "मग तुम्ही एकटेच पायी पायी निघालात?" हो त्यांच्याकडे कुणीतरी आलंय. बोलत बसलेत. माझी गाडी निघून जाईल म्हणून मी एकटाच निघालोय. "बसा, मी सोडतो तुम्हाला बस स्टॅन्डवर" नको नको मी जातो हळू हळू. पाय मोकळे होतील."अहो बसा मामा, ते स्टॅन्ड काय जवळ आहे का?"मामा त्या दुचाकीवर बसले. स्टॅन्डकडे जायला निघाले.

दुचाकीवर बसल्या बसल्या गप्पा मारत होते. स्टॅन्डवर आले. प्रकाशनं मामाला विचारले, "गाडी किती वाजता आहे?" "पावणे दहा वाजता आहे" बस यायला वेळ आहे ... तोपर्यंत चहा घेऊन घ्या. "नको नको मी जेवण केलंय" या हो मामा, अर्धा अर्धा कप घेऊत. प्रकाश काय म्हणेल मला."मामा आणि नागेश चहाच्या हॉटेलवर गेले . नागेशनी दोन कट चहाची ऑर्डर दिली. चहावाला चहा बनवत होता. तेवढ्यात मामा आणि नागेश गप्पा मारत होते. गप्पा मारता मारता नागेश म्हणाला की, "मामा आज सगळ्यांचं थांबायचं होतं की, का घाई करताय गावाकडं जायची?"हो... खरं आहे, थांबायला हवं होतं... थांबणारही होतो.. पण प्रकाश मात्र कालपासून एक शब्दही बोलले नाही. कसेतरी वाटाय लागलं, म्हणून निघालोय" असं का बरं करतोय प्रकाश. प्रकाश तर तसा करणारा वाटत नाही.चांगला पोरगा आहे. चला चला मी सांगतो प्रकाशला, त्याला बोलतो."नको नको आता चला आपणं बरं दिसत नाही. "का बरे तो बोलला नाही?" मध्यंतरी प्रकाश नाशिकला कुटुंबासहित आले होते. आम्हाला फोनही केला होता ;पण आमचे त्यांना भेटायला जायला जमले नाही. त्यामुळे त्यांना राग आला असावा. 'तेवढ्यात गाडी आली. प्रकाश आणि मामा गाडीकडं जाऊ लागले. मामा गाडीत चढले आणि हसाने बाय बाय करत नागेश प्रकाशाच्या घरी निघून आला. प्रकाश घरी होता. तेवढ्यात नागेश आला."ये, ये नागेश, अरे येना, कसा आहेस" काही नाही... एकदम मजेत आहे."कसं काय येणं केलं"अरे काही नाही. पेपर आणायला बस स्टॅन्डला चाललो होतो तर रस्त्यात तुझे मामा भेटले. त्यांना सोडून आलो. पेपर घेतले अन् आता जाता तुझ्याकडून जावा म्हणून आलोय."अरे हो ते मामा काल दुपारी आले होते;मी त्यांच्याशी बोललो नाही. मागच्या महिन्यात मी नाशिकला गेलो होतो. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांच्या घरी मुक्कामी जाणार होतो,त्यांना फोनही केला होता. ते आम्हाला भेटायला येतो येतो म्हणून आले नाहीत. मामा आले नाहीत त्यांचे मुलंही आले नाहीत. इकडे मात्र त्यांची नातवंड, मुलगी वाट पाहत होती. स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचीही त्यांना काळजी नाही. असले नाते काय कामाचे! मुलगीसुद्धा वडिलांना बोलली नाही. तिलाही त्यांचा फार राग आला होता. नुसते गोड गोड बोलतात. सतत ते असेच करतात, विश्वासघात करतात." अरे जाऊ दे. माफ करायचं त्यांना."प्रकाश तुझे म्हणणे खरे आहे... पण माणसाला काही माणुसकी आहे की नाही. पाहुणे रावळे कशासाठी असतात? माझ्या मुलांची त्यांना काय काळजी आहे की नाही?आपुलकी आहे की नाही? मामा झाला म्हणून काय झालं? त्यांच्याकडं आमच्याविषयी प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, माया, ममता आहे की नाही. आपणच त्यांना आदर करायचं, विठ्ठलायचं आणि त्यांनी मात्र आम्हाला बाजूला फेकून द्यायचे, हे माणुसकीला धरून नाही. म्हणून बोललो नाही. "हो. अरे तुझं सारे खरं आहे;पण आता काय करायचं? तेच घेऊन बसायचं "अरे हो बाबा.. मलाही काल कसेतरी वाटले. फार वाईट वाटले. मी तसं करायला नको होतं वाटलं.

संवेदनशील मनाला दुःख झाले.पण ते सारे कधीही असेच वागतात. खोटं बोलतात. बनवाबनवी करतात अन् वेळ मारून नेतात. ते दुसऱ्यांच्या मनाचा विचार कधीच करत नाहीत. मग त्यांना असतं तसं वागायला? मग आपणही असे केले तर काय बिघडले? "ते सारे खरं आहे. पण आपण किती ताणून धरायचं. याचा आपल्याला व त्यांनाही मनस्ताप होतो. धरसोड करायचे." अहो तुमचे खरे आहे पण ते काही अडाणी माणसं नाहीत. शिकलेले आहेत. खरे तर आज हल्ली अनेक शिकलेलेच अनेक लोक मॅनर्स नसल्यासारखे वागताना दिसतात. आपल्याच तंद्रीत राहताना आणि वागताना दिसतात. तंद्री ही अहंकाराची असते. माझ्यासारखा या जगात कुणी दुसरा शहाणा नाही असे त्यांना वाटत असते. तंद्री आणि अहंकारामुळे मानवी जीवन, मानवी मूल्ये उध्वस्त होत चालले आहेत. मग त्यांनी तरी असे करायला नको. मानवी मूल्ये, नीतिमूल्ये, समाजमूल्ये त्यांनी जपायला हवीत. कारण माणूस हा एक समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय जगू शकत नाही. समाजाशिवाय राहू शकत नाही. समाजाशिवाय माणसाचं अस्तित्वही नाही. म्हणून समाजात राहताना, वागताना, बोलताना, चालताना विचारपूर्वकच राहणे गरजेचे आहे.दुसऱ्यांच्या मनाचा विचार करणेही गरजेचे आहे.

समाजाचे नीतिमूल्ये आहेत त्यांची जपणूक प्रत्येकाने केलीच पाहिजे. याच नीतिमूल्यावर, त्याच्या जपणुकीवर, आचरणावर माणसांचे मोठेपण अवलंबून आहे. अन्यथा माणसाला कवडीमोल किंमत आहे. हे ज्यांच्या ज्यांच्या ध्यानी, मनी आणि आचरणी येते तेच माणसं मोठी झाली आहेत. महान ठरली आहेत. त्यांचाच आज जयजयकार होतो आहे. सत्य, अहिंसा, दया, माया, प्रेम, करुणा, मानवता, त्याग, कर्तव्यनिष्ठा, विवेक, स्वाभिमान अशी अनेक मानवी मूल्य जीवनाला आकार देत असतात आणि घडवतही असतात. ही मूल्य चिरंतन असतात. माणसाच्या जीवनाला सुंदर, संपन्न आणि सुखी बनवणं हेच या मूल्याचे कार्य असते. त्यामुळे सतत माणसाने याकडे डोळे उघडे ठेवून जीवनाची वाटचाल करायला हवी. अनेकदा माणूस या मूल्यांच्या विरोधी वागतो अन् स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची, जीवनाची हानी करून घेत असतो. त्यामुळे माणसाने सतत मूल्यांचा जागर करायलाच हवा म्हणजे माणसानं कसं माणसासारखं वागायला हवं

लोकमत

# हा भंपकपणा आता पुरे!



आज राजकारणात स्वार्थ फार मोठ्या प्रमाणावर बळावला आहे. हेवेदावे खूप वाढले आहेत. सत्तेचा, पदाचा गैरवापर सर्रास होताना दिसतो.

कोरोनाच्या काळात तर सामान्यांचे पार कंबरडे मोडले आहे. जीवन जगणे असाहाय्य झाले आहे. सर्व स्तरावर वेगवेगळे प्रश्न आहेत. कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न आहेत. अनेकानेक कारणांनी सामान्य माणसांचे जीणे मुश्कील केले आहे. हे मुद्दे माणसांच्या जीवनाशी आणि जगण्याशी निगडित असताना अशांकडे डोळेझाक केली जाते. नको ते प्रश्न मांडून भावनिक मुद्द्यांना हात घालून नको ते राजकारण केले जात आहे. राजकारण इतके गढूळ झाले आहे की त्यामध्ये स्वच्छता आणि पारदर्शकता कुठेच दिसेनाशी झाली आहे. त्यामुळे नवीन राजकारणात येऊ इच्छिणाऱ्यांनी काय शिकावे? राजकारणातील वरिष्ठांकडून काय धडे घ्यावेत? विकासाचे मुद्दे मांडले जात नाहीत. वैचारिक, बौद्धिक, विकासाचे मुद्दे बाजूला सारली जातात.

राजकारणातली वायफळ बडबड, अराजकता थांबवायला हवी. ज्यांनी निवडून दिले आहे, आपल्यावर विश्वास टाकला आहे अशा सामान्य माणसाचे प्रश्न सोडवून त्यांना दिलासा द्यायला हवा. हा भंपकपणा आता पुरे झाला!

- प्रा. डॉ. सतीश मस्के, पिंपळनेर


New Delhi
Page No. 6 Sep 09, 2021
Powered by: erelego.com

# खान्देशातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समग्र मानवजातीच्या कल्याणाचे नाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका क्रांतीचं नाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने अनेक नाविन्यपूर्ण,ऐतिहासिक क्रांतिकारक बदल, परिवर्तन आणि प्रबोधन घडवून आणून आपलं नाव अनेकांच्या काळजात कोरलं तर आहेच पण त्याचबरोबर चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे प्राण्यापेक्षाही हीन वागणूक मिळत असणाऱ्या माणसांचे जगणे त्यांनी सन्मानाचे,प्रतिष्ठेचे केले.चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या जोखडातून, गुलामगिरीच्या आणि नानाविध शोषणाच्या मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी स्वतःच्या जीवाची,घराची,संसाराची एवढेच काय तर मुला बाळांचीही पर्वा न करता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनमोल कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या खान्देशातील चळवळीचा,जीवन कार्याचा इतिहास वाचल्यानंतर लक्षात यायला लागते की,समाजातील अनेक सुशिक्षित, अल्पशिक्षित ,नोकरदार,गायक,कलाकार,

सर्वसामान्य माणसे,स्त्रिया व इतर जातीतील सवर्णांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य समाजात रुजविण्यासाठी जिवाची, नोकरीची,संसाराची पर्वा न करता कार्य केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना श्वास होते म्हणून त्यांनी आंबेडकरी विचार,मानवतेचा विचार, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचा विचार तळागाळापर्यंतच्या माणसापर्यंत रुजविलेला दिसून येतो. आजच्या अशा या असहिष्णुतेच्या वातावरणामध्ये विविध जाती धर्मातील भरकटलेल्या व अज्ञानी असलेल्या तरुणांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार, परिवर्तनाचा इतिहास निश्चितच दिशादर्शक, मार्गदर्शक ठरणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,ज्यांना इतिहास माहीत आहे तेच इतिहास घडवू शकतात.निर्माण करू शकतात. क्रांती करू शकतात.प.मरगळलेल्या समाजात नवचैतन्य निर्माण करू शकतात. याच भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आहे. त्यामधूनच खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड १ या ग्रंथाचा जन्म झालेला आहे.

खान्देशातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास खंड १ हा ग्रंथ प्रा.गौतम निकम, डॉ. सतीश मस्के, डी.एस. घोडेस्वार, प्रतापराव साळुंके, बाबुराव वाघ व कल्पतेश देशमुख यांनी संपादित केला आहे.साधारणपणे सव्वाद पेजेसचा हा ग्रंथ असून यामध्ये एकूण चार भाग करण्यात आले आहेत. पहिल्या भागामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बहिष्कृत भारत, मुकनायक,जनता व प्रबुद्ध भारत यामध्ये खानदेशातील आंबेडकरी चळवळी संदर्भातील प्रकाशित झालेले जे वृत्त आहे त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. दुसऱ्या भागामध्ये महा. बाबासाहेब आंबेडकरांचे खानदेशातील भाषणे,भेट आणि जनसंवादक यांचा समावेश केला आहे. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुळे,जळगाव, भुसावळ, नंदुरबार,चाळीसगाव, मक्रणपूर व इतर काही खेड्यापाड्यात गेलेले आहेत. कोर्टाच्या कामानिमित्त, निवडणुकीच्या कामानिमित्त, वसतिगृहांना भेट देण्याच्या कामानिमित्त, कार्यकर्त्यांना भेटण्याच्यानिमित्त ते खान्देशात आलेले




आहेत. बेळाप्रसंगी त्यांनी विविध ठिकाणी भाषणे देऊन या दलित अस्पृश्य बांधवांना मार्गदर्शन केलेले आहे.जागृती घडवून आणली आहे. त्या संदर्भातील माहिती दुसऱ्या प्रकरणात दिली आहे. खान्देशाचे दोन भाग



## पुस्तक परिचय

प्रा.डॉ.सतीश मस्के
9423397484

पडतात. पूर्व खान्देश व पश्चिम खान्देश.पूर्व खान्देश म्हणजे जळगाव जिल्हा व पश्चिम खानदेश म्हणजे धुळे,नंदुरबार जिल्हा होय. तिसऱ्या भागामध्ये म पूर्व खान्देशातील आंबेडकर पूर्व,आंबेडकर कालीन,आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्यांचे समर्पित जीवनकार्यपटाचा आढावा घेतलेला आहे. चौथ्या भागामध्ये पश्चिम खान्देशातील

आंबेडकर पूर्व, आंबेडकरकालीन आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्यांचे समर्पित जीवनकार्यपट यांचा आढावा घेण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने खान्देशातही अनेक कार्यकर्ते लढाऊ संघर्षशील बाण्याचे तयार झाले होते. ते कार्यकर्ते फक्त दलित अस्पृश्य समाजातील नव्हते तर दलितेतर म्हणजेच उच्चवर्णीय समाजातीलही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर खान्देशात येऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असत. आजूबाजूच्या ठिकाणी नाशिक, मनमाड,औरंगाबाद,महाड व इतर ठिकाणीही खान्देशातील कार्यकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेस,कार्यास उपस्थित राहत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या परिवर्तनशील चळवळीत, प्रबोधन चळवळीत, क्रांतिकारी चळवळीत व विविध कार्यात उच्चवर्णीयही भाग घेत होते. बर्वे वकील,शेल्वीकर वकील,वैद्य वकील ,सोनाळकर वकील,पाटसकर वकील, धनाजी

चौधरी, मातेगुरुजी असे अनेक उच्चवर्णीय मंडळी यामध्ये सहभागी झालेली होती. त्यांचेही कार्य त्यांच्या चरित्र रुपाने मांडून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा या ग्रंथामध्ये घेतला आहे. या उच्चवर्णीय समाजातील मंडळींनी शेती,विहीर,शाळा,धर्मशाळा,मठ, मंदिरे अस्पृश्य बांधवाकरिता मोकळे करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर अस्पृश्य समाजातील भीमराव साळुंखे, सुखदेव केदार, संपत शिरसाठ, शिवाजी खरात, अण्णासाहेब लळींगकर कर्मवीर सेनू नारायण मेढे, माधवराव इसाळगे,भिकण बहिरूणे, दिवाण चव्हाण, धनाजी बि-हाडे, दौलतराव जाधव, भाऊसाहेब मोरे, शांता दिवान चव्हाण, जगन्नाथ आनंद निकम, विद्रोही कवी त्र्यंबक सपकाळे असा अनेक कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना साथ देऊन अन्याय अत्याचाराविरुद्ध लढणारे कार्यकर्तेही तयार केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार खान्देशामध्ये पेरण्यासाठी त्यांच्या खांद्याला खांदा लावून प्राणपणाने कार्य केले आहे. त्यांच्याबरोबर अनेक कार्यकर्त्यांचा संबंध आला त्यांचाही व त्यांच्या कार्याचाही आढावा या ग्रंथामध्ये घेतलेला आहे. खान्देशातील आंबेडकरी चळवळीचा एक सर्वसमावेशक दस्तऐवज असावा त्यात अनेक स्त्री पुरुष कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य प्रसंगी आपले कुटुंब पणाला लावून येथे आंबेडकरी चळवळ रुजवली,फुलवली. त्यांची व त्यांच्या कार्याची दखल घेतली जावी आणि इतिहासात त्यांना न्याय मिळावा.भारतात अनेक चळवळी जन्माला आल्या,मोठ्या झाल्या परंतु यात सर्वाधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे ती आंबेडकरी चळवळ. प्रतिकूल परिस्थितीत संसाधनांचे अपूर्णता असतानाही तळागाळातील माणसांपर्यंत आंबेडकरी चळवळ पोहोचले.या वर्गात स्वाभिमान जागृत करते लढाईसाठी बळ देते आणि भावनिक ऋणानुबंध तयार होतात.त्याचे श्रेय या चळवळीचे तत्वज्ञान आणि धडपडणारे सर्व कार्यकर्ते यांचेच आहे. म्हणूनच या ग्रंथाचा जन्म झालेला आहे.खान्देश भूमी ही आंबेडकरी चळवळीचे केंद्र होती. या सर्वांचा ज्वलंत इतिहास,आंबेडकरी चळवळीचे कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत आजच्या तरुण पिढीला जागृत करण्यास,प्रेरणा,प्रोत्साहन देण्यास निश्चितपणे हा ग्रंथ उपयोगी पडेल.संशोधकासाठी इतिहास जाणून घेण्यासाठी व संशोधन कार्यास मदत होईल. यात तिळमात्र शंका नाही. वाचक निश्चितच स्वागत करतील अशी आशा आहे.

- खान्देशातील आंबेडकरी चळवळ खंड-१
- संपादक : प्रा. गौतम निकम,प्रा. डॉ. सतीश मस्के, डी.एस.घोडेस्वार, प्रतापराव साळुंके, बाबुराव वाघ, कल्पतेश देशमुख
- विमलकिर्ती प्रकाशन, विमानतळ, चाळीसगाव
- मोबाईल : ९४२३९१५५१०
- पृष्ठे - ६९०
- मूल्य- १००० रुपये.

- मराठी विभागप्रमुख,
कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर, ता.साक्री, जि.धुळे

# गुरुजी, शिक्षणातून माणूस घडवा..!

• विचार



• प्रा. डॉ. सतीश मस्के

*अभ्यासक्रमाच्या, शिकवण्याच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जसे घडवायला पाहिजे तसे शिक्षकांकडूनही होताना दिसत नाही. शिक्षण, शिक्षक, अधिकारी, संस्था, तेथील वातावरण गढूळ झालेय. त्याचा परिणाम समाजस्वास्थ्यावर होतोय.*

शिक्षणक्षेत्रातील जबाबदार आणि महत्त्वाचा घटक म्हणून शिक्षकाकडे आदराने, सन्मानाने पाहिले जाते. शिक्षक समाजासाठी, देशासाठी, सुसंस्कृत, नीतिवान, धैर्यवान आणि चारित्र्यवान विद्यार्थी तयार करून उत्तम नागरिक घडविण्याचे कार्य करतो. समाजाच्या दुःखाचे मूळ कारण अज्ञान आहे. म्हणून प्रत्येक जण शिक्षणाला प्राधान्य देतो. तरी अजूनही तोच समाज, देशासमोरील समस्या तेवढी माणसांच्या आचरणात प्रगती होताना दिसत नाही. याचे मूळ कारण म्हणजे आम्ही शिकल्यानंतरही बहुतांश बुरसटलेले विचार, जुने विचार मनात घेऊन जगतो. एकमेकांचा द्वेष करतो, वाटेल तसे वागतो, हुकूमशाही पद्धतीने चालतो, अहंकार बाळगतो. मग कशी आमची प्रगती होणार? शिक्षणामुळे माणूस सर्वगुणसंपन्न, बहुश्रुत व्हायला हवा; पण तसा होताना दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे माणूस जुनं सोडून वागायला तयार नाही. प्रचलित भ्रष्ट राजकीय आणि शैक्षणिक व्यवस्था त्याला कारणीभूत आहे. शैक्षणिक क्षेत्रात विषमता, असमानता वाढत चाललीय. याचा परिणाम तरुण पिढीवर होतोय. सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढतेय. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून, शिकवण्याच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जसे घडवायला पाहिजे तसे शिक्षकांकडूनही होताना दिसत नाही. शिक्षण, शिक्षक, अधिकारी, संस्था, तेथील वातावरण गढूळ झालेय. त्याचा परिणाम समाजस्वास्थ्यावर होतोय. असे वातावरण जर



शिक्षण क्षेत्रात असेल तर परिवर्तन कसे होईल? बदल कसा होईल? [illegible] हे थांबायला हवे. शिक्षण क्षेत्रातील सगळ्यांनी विचारपूर्वक वागून शिक्षणातून माणूस घडवावा लागेल, तो माणूस देशाच्या कामी कसा येईल, यासाठी प्रयत्न करायला हवेत.

'जुना जमाना मेला गुरुजी
आदर व्हायचा खूप
रोज पहाटे घरी यायचे
ताजे निरसे दूध
गुरुजी होता
गावामध्ये माणुसकीचा भाव
मांगा तयार आता
उरला का कुठे भाव'

एकेकाळी गुरुजींना असणारी किंमत आम्ही गमावून बसलो आहोत.

हे खरे आहे गुरुजी, आपणच आपली स्वतःची किंमत इतकी कमी करून घेतली आहे की गुरुजी म्हणवून घ्यायलाही लाज वाटते आहे. आमचे बोलणे, चालणे, वागणे पार बदलले. गुरुजी आपण शिकवताना जातीयवाद, धर्मवाद, विषमतावाद शिकवतोय; पण त्याचबरोबर आम्ही आचरणाशी समन्वय करतो. शाळेत, विद्यापीठ स्तरावरील वेगवेगळ्या कमिटीत आपल्याच जातीच्यांना, नातेवाइकांना स्थान देतो. विद्यापीठ पातळीवर, प्राथमिक, माध्यमिक शैक्षणिक पातळीवर गुणवत्तेला डावलले जाते. या क्षेत्रातील अधिकारी जात, धर्मावर बढती देतात. अशा वातावरणात विद्यार्थी काय घडणार?

आज समाजात जे असहिष्णु वातावरण निर्माण झाले आहे त्याला काही मोठ्या प्रमाणावर शिक्षण क्षेत्र आणि त्यातील शिक्षक जबाबदार आहे, असे मला वाटते. शिक्षकांना पगार भरपूर आहे, मात्र त्याबदल्यात शिक्षकांनी जसे शिकवायला पाहिजे, बदल करायला पाहिजेत, तसे शिक्षक करताना दिसत नाही. ही वस्तुस्थिती आहे. गुरुजी, हे बदलायला हवे. आत्मपरीक्षण करायला हवे. शिक्षणातून विकसित झालेला माणूस शिक्षकांनी शिकवायला हवा गुरुजी...

• संपर्क : ९४२३११९७८४

लोकमत

# सामाजिक परिस्थिती व संघर्ष हीच लेखन प्रेरणा



माझी लेखन प्रेरणा

प्रा.सतीश मस्के

जीवन एक संघर्ष आहे, असं म्हटलं जातं, हे वास्तव नाकारता येण्यासारखं नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात जीवन जगत असताना अनेक चांगले वाईट अनुभव येत असतात. काही अनुभव माणसाला बदलायला भाग पाडतात, तर काही अनुभव माणसाला शांत बसायला म्हणजेच गुलामी, लाचारीत जीवन जगायला भाग पाडतात. जीवन जगत असताना परिस्थिती, संकटामुळे अनेकांच्या जीवनात उतरती कळा लागते. अनेकजण घाबरून जीवनाला कंटाळतात. जीवन नकोसे वाटायला लागते; पण जीवन हे संघर्ष आहे ते जगायला हवे. अनेक महापुरुष संघर्षानेच घडले आहेत. फुले, शाहू, आंबेडकर यांचे चरित्र वाचण्यात आले. जगण्याची ऊर्मी निर्माण झाली. जीवनाला आकार येऊ लागला. जीवनात आलेल्या या दाहक अनुभवांना, संकटांना, परिस्थितीच्या चटक्यांना कुठे तरी वाट काढून द्यावी म्हणून कुठे तरी शब्दाचा आधार घ्यावा असे वाटले. मग ते कधी कवितेच्या, कथेच्या किंवा वैचारिक लेखनाच्या माध्यमातून मांडू लागलो. समाजात वावरताना ज्या ज्या ठिकाणी विषमता, अन्याय, अत्याचाराच्या घटना विविध पातळीवर घडतात त्यांच्याकडे डोळस नजरेने पाहू लागलो.

भोवतालचा परिसरही नानाविध समस्यांनी भरलेला असतो. अनेक ठिकाणी कौटुंबिक कलह निर्माण होत आहेत, सार्वजनिक ठिकाणी व शाळा महाविद्यालयात विद्यार्थी, कर्मचारी यांचे होत असणारे शोषण, त्यांना दिली जाणारी अपमानकारक वागणूक, नातेवाइकांत वाढत जाणारी विषमतामय दरी अशा अनेक बाबी बघण्यात येतात. मनाला भेडसावतात म्हणून त्यांना कुठेतरी मोकळी वाट करून द्यावी, त्यांना वाचा फोडावी म्हणून लेखनाचा आधार घेऊ लागलो. जेणेकरून अनेकांचे मन खंबीर आणि गंभीर होईल. अनेकांना जीवन जगण्यास ते प्रसंग प्रेरणादायी ठरतील, प्रोत्साहन मिळेल म्हणून ते मांडत राहिलो व अशा प्रसंगातून लेखनाची प्रेरणा मिळत राहिली.



केसरी
27 Mar 2022
https://epaper.adhunikkesari.com/news/8786/623f266a2389...

# आदिवासींच्या संविधानिक अधिकार जागृतीविषयीचा ग्रंथ




प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423387484

आधुनिक केसरी

प्रा. गौतम निकम यांनी आदिवासी समाजात परिवर्तन विचारांची जागृती, क्रांती निर्माण व्हावी म्हणून त्यांनी 'मूलनिवासींचे सक्षमीकरण', 'आदिवासींच्या समस्या - एक अभ्यास', 'बिरसा मुंडा आणि मुंडा आदिवासी', 'आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक आणि तंट्या भिल्ल' व इतर काही पुस्तके लिहिली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे केवळ दलितांचे, अस्पृश्यांचे म्हणून पाहिले जाते. त्यांनी सर्व मानवजातीसाठी केलेल्या कार्याकडे, भारतीय संविधानाकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केले जाते. या संकुचित मानसिकतेला आदिवासीही अपवाद नाहीत. आदिवासी समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानामुळे अनेक सवलती, नोकरी मिळाल्या. अनेकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. परंतु त्यांच्यावर असलेल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या पगड्यामुळे, प्रभावामुळे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याकडे दुर्लक्ष करताना दिसतात हे वास्तव नाकारता येण्यासारखे नाही.

[illegible]




[illegible]

आदिवासींचे संविधानिक अधिकार व पेसा ॲक्ट १९९६
लेखक : प्रा. गौतम निकम
विद्यार्थीप्रिय प्रकाशन, चाळीसगाव

# जीवन संघर्षाची दर्दभरी कहाणी-पेवुळ

आयुष्याचा प्रवास हा प्रचंड खडतर असतो. तो अनुभवाव कळतो त्यासाठी आयुष्य जगावे लागते. असा खडतर आयुष्याचा प्रवास जगल्या नंतर आयुष्याचे मोल कळत असते. तेच आयुष्य इतरांना प्रेरणा देणारे, मार्गदर्शन करणारे ठरत असते. असाच खडतर आयुष्याची कहाणी प्रवीण पहुरकर यांनी 'पेवुळ' या आत्मकथनात मांडली आहे. आत्मकथन लिहिणे ही तारेवरची कसरत असते. अवघड गोष्ट असते. जीवनात आलेल्या वास्तविक अनुभवाचे कलेने शब्दांकन करणे हे अवघड असते. अनेक जवळची माणसे दूर लोटली जाऊ शकतात. अनेक माणसे दुखावू शकतात. म्हणून आत्मकथन लिहिणे हे धाडसाचे काम आहे. ते धाडस प्रवीण पहुरकर यांनी केले आहे.

प्रवीण पहुरकर यांचे पैठी पब्लिकेशन, हडपसर, पुणे यांनी 'पेवुळ' नावाचे दोनशे आठ पानाचे आत्मकथन प्रकाशित करून त्यांच्या जीवनाची दर्दभरी, संघर्षशील कहाणी समाजासमोर मांडली आहे. यापूर्वी प्रवीण पहुरकर यांचे 'आंबेडकरी चळवळ: काल आणि आज' (वैचारिक), व 'मानूस' (काव्यसंग्रह) ही दोन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. पेवुळ या आत्मकथनात प्रवीण पहुरकर यांनी आपल्या संपूर्ण जीवनाचा आलेख अगदी कलात्मकतेने निरक्षेपणे मांडला आहे. हे आत्मकथन जगण्यासाठी म्हणजे भाकरीसाठी, राहण्यासाठी, नोकरीसाठी, विविध पातळीवर सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक, जातीय, प्रशासकीय पातळीवर करावा लागणारा संघर्ष, दारिद्र्यामुळे भोगाव्या लागणाऱ्या जीवघेण्या यातनांचा हा संघर्ष आहे. म्हणूनच प्राथमिक शाळेत नाव घालण्यापासून ते सेवानिवृत्तीपर्यंतचा प्रवास आणि नंतर सामाजिक कार्यात स्वतःला पूर्ण झोकून देऊन करत असलेल्या कार्याचा प्रवास त्यांनी मांडला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे समाज जागृती पडण्यास मदत झाली. त्यांनी सांगितलेला शिका! संघटित व्हा! आणि संघर्ष करा! हा संदेश अडाणी लोकांच्या मनावरही त्यावेळी चांगलाच बिंबला होता. त्याच काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्म १९५६ साली स्वीकारला होता. त्याचे पडसादही त्यावेळी समाजमनावर प्रचंड उमटले होते. प्रवीण पहुरकर यांच्या आई-वडिलांच्या मनावरही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव प्रचंड होता. आईलाही वाटत होते की, आपल्या मुलाने शिक्षण घेऊन मोठे बाबासाहेबांसारखे साहेब व्हावे. म्हणूनच प्राथमिक शाळेत नाव घातले होते. त्यावेळेस त्यांच्या हजेरीवर 'बौद्ध' म्हणून नोंदलेले दिसून येते. प्रवीण पहुरकरांचे आईने ठेवलेले नाव 'ईश्वर' असे होते. ते नाव मात्र त्यांना अजिबात आवडत नसे. ते आईला वारंवार विचारत असत की, माझे नाव तू 'ईश्वर' का ठेवले? त्यावेळी आईने सांगितले की,' तू साधा १४ वर्षांचा... माझे कुणीच वाचत नव्हते. झाले की मरायची. म्हणून वाचविण्यासाठी 'ईश्वर'चे नाव ठेवले. लेखकाचे वडील टेम्पोत [illegible] म्हणून कामावर होते. पगार कमी होता. वडिलांनी दुसरे लग्न केले होते. दुसऱ्या लग्नामुळे कुटुंबाला दारिद्र्य आणि उपासमारी दिवस काढावी लागली. हाल सोसत सोसत जीवन जगावे लागले. लेखकाच्या आईला धोबघाट-कष्टाची कामे करावी लागायची. एक अंधी शिवूनही घरचा संसार चालवावा लागला. याचेही चित्रण त्यांनी यामध्ये केले आहे.

जातीव्यवस्थेतील इथल्या अस्पृश्य समाजाला प्रचंड त्रास देणे, मानवी मूल्यांची मोडतोड केली. माणसामाणसातला माणसाला गुलाम म्हणून वागविले. ते आजही चालू दिसते. शिवाशिवीमुळे (बाट) या अस्पृश्य समाजातील माणसांचे जीवन जगणे कठीण केले होते. इतकेच नव्हे तर माणसाला माणूस म्हणून वागणूक दिली जात नसे. त्या वागणुकीचे लेखकाला बालपणी सहन करावे लागल्याचे आहे. लेखक पुरुषोत्तमच्या शाळेत शिकत असताना नळाच्या पाणीचे लेखकाला खूप त्रास लागली होती. शाळेच्या बाजूलाच पाटील, कुणबी, मराठा समाजाची घरे होती. त्यातील एका दारात एक बाई उभी होती. त्या बाईला लेखक बाहुलांतील येऊन म्हणाले की, 'मावशी, मला खूप तहान लागली पाणी द्या. ती बाई म्हणाली,' अरे पोरा तुम्हा महाराबाड्यात जाय. तठी पेवुन तुझे पाणी.' या जातिव्यवस्थेतील लेखकाला वेळोवेळी सामने आले त्याचे उल्लेखही लेखकाने यामध्ये दिले आहेत. लेखकाला बालपणीच गरिबीचे चटके सहन करावे लागले. त्यामुळे सहाजिकच त्यांचे जीवन दु:खात गेले. लेखकाची आई गरिबी परिस्थितीमुळे गावातील एकाच्या घरकामाच्या शेतात मजुरीला जात होती. लेखक शाळेत शिकत असताना




बोर्डाची परीक्षा द्यायला गावापासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या शाळेत पायी जावे लागत असे. त्यावेळी प्रत्येकाचे इथे गावातून आणण्यासाठी एक मजूर गाडीवाल्यांकडे ठेवण्यात आला होता. तो मजूर इथे माझ्या बापाकडे विचारपूस करीत म्हणाला की, महाराच्या पोराची आणीव पण आणायचे काय? म्हणजे माझ्या इच्छेमुळे इतरांचे इथे बाटतील असा त्याच्या म्हणण्याचा रोख होता. अशीच जातीची दाहकता हळूहळू लेखकाला कळायला लागली होती. परंतु त्यावेळी इथे मराठी आपल्या [illegible] लेखकाने नमूद केले आहे.

वेगवेगळ्या आत्मकथनातून जीवन जगण्यासाठी, पोटाची खळगी भरण्यासाठी करावा लागणारा संघर्ष या मोठ्या प्रमाणावर मांडलेला दिसून येतो. तसा संघर्ष लेखकाच्या वाट्याला आलेला दिसतो. १९७२ साली भयानक दुष्काळ पडला. सलग दोन वर्ष पाऊस पडत नाही त्यामुळे शेतीतील पीक येत नाही. सारी शेती ओसाड पडली होती. शेतात कामधंदा नव्हता. अशावेळी लोक शिवाच्या झाडाच्या शिवेवरच पोट भरायचे. इथे गोळा करायचे ते शिजवून त्याचे भाकरी करायचे खायचे त्यावरच उदरनिर्वाह करायचे. अशा परिस्थितीत लेखकाच्या आईला आवडती करणे लागले. आई घरातील पिठाचे भाकरी शिजवत व दुष्काळ घ्यायला लागले. परिस्थिती पुढे नेऊन शिक्षण होत नाही. परंतु दुष्काळ भयानक होता. सरकारने शाळेतून लाल गव्हाची मिलो ज्वारी आणली होती. असे म्हणतात की ही ज्वारी अमेरिका, रशियामध्ये जनावरांना खाऊ घालत परंतु ती मिलो ज्वारीपासूनच काही-काही आपल्याकडे पोट भरायचे. ही ज्वारी इन्स्पेक्टर वाटायची. इन्स्पेक्टर अडाण्या लोकांना मोजायचे. आई ती ज्वारी गोळा करायची व आम्हाला खाऊ घालायची. इतकेच काय तर पटवाऱ्याच्या शेतातून आणलेले काही लेखकाला आई आणून खाऊ घालायची. पटवाऱ्याच्या घरी इथे, शिवाय भाकरी म्हणून आणायची. तीच आम्हाला खाऊ घालायची. अशावेळी पाटील मन आम्हाला काही-काही पेवुळ खायचा. पेव म्हणजे जमिनीतील खूप खोल खड्डा खोदून त्यात ज्वारीचा साठा केलेला असायचा त्याला पेव म्हणायचे. त्यातील सर्व ज्वारी काढल्यानंतर तळाला जी ज्वारी उरलेली असते. ती शिजवली काळेली, सडकी कुजलेली, खराब आणलेली म्हणजे खराब शिजली झालेली. खाण्याचा उपयोगी नसलेली. निकृष्ट दर्जाची ज्वारी. त्याला पेवुळ म्हणत. तीच ज्वारी काढून आणून आई आम्हाला खाऊ घालायची. या अशा जगण्याचे, दारिद्र्याचे, अपमानाचे चित्रणाची कल्पनेही लेखकाने यामध्ये अत्यंत संवेदनशीलतेने मांडले आहे.



पुस्तक परिचय

प्रा.डॉ.सतीश मस्के
9423397484

नोकरी मिळेल म्हणून लेखक मुंबईलाही जातो. तिथे नातेवाईकांच्या घरी राहतो. ती घरे खूप छोटी. अशावेळी लेखक बाहेर झोपत असे. तिथे मुंबईत लेखकाने नवीनच बांधकामाच्या हमालीची मजुरीचे काम केले, सीमेंटची नोकरी केली, पैसा मिळवण्याचे काम केले. असेच पोस्ट खात्यात जागा निघाल्या म्हणून लेखकाने अर्ज भरला. लेखकाला परीक्षेचे पत्र आले. लेखकाला खूप आनंद झाला. लेखकाने वांद्रे पोस्ट ऑफिस मुंबई कार्यालयात नोकरी करायला सुरुवात केली. आईला नोकरीविषयी पत्र पाठवले. आता नावाचे जगणे सोडून दे. माझ्याजवळच मुंबईला राहायला ये. तिथे माझा पगार खूप कमी भाड्याच्या आहेत. अनेक काम सहन केले आहे. घरा माझ्याच्याने मोठी केले आहे. नोकरी लागल्यानंतर आईने लग्नाची करायचे ठरविले. परंतु लग्न झाल्यानंतर संसार चार काही सुरळीत चालत नसे. पत्नी गावाकडे आईजवळ राहिली. ती सासूचे ऐकत नसायची. त्यामुळे असा कौटुंबिक कलहाच्याही लेखकाचे जीवन प्रचंड घुसमटलेले आहे. अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पुढे पोस्ट ऑफिसमध्ये लागल्यानंतर बदली आणि कामाचे ठिकाणचे त्रासदायक नवीन सुरू झाले होते. ते एकमेकांना जय-भीम म्हणायचे. त्यावेळी मात्र इतर जातीवादी प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांना ते पटत नसायचे तरी ते करायचे. त्यामुळे आपल्याला ते कसा त्रास द्यायचा याची योजना आखायचे. एकीकडे परिस्थितीने लेखकाला त्रास दिला तर दुसरा नोकरी लागल्यावरही अधिकाऱ्यांमधूनही त्रास होत होता. तो त्रास आजच्या काळात विविध क्षेत्रात नोकरी करणाऱ्या, कार्यकर्त्यांना आजही भोगावा लागतो आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मुंबईत राहताना झोपडपट्टीमधल्या दुःखाची दाहकता होती. त्यामुळे त्याला एक घर घेऊन घर सोडावे लागले. आईमुळेही ते घर सोडलेल्या त्रासाने लागले. आईमुळेही प्रचंड त्रास सहन करावा लागायचा. आईची वागणूक म्हणजेच मुलीच्या बाजूने बोल लावायची. पुढे हळूहळू लेखकाने बायको, मुलगा, कन्या अशा कुटुंबासोबत नोकरी करून आपला उदरनिर्वाह भागवला. सुमारे काही पगारात भागत नसे म्हणून लेखकाने दुसरी केलेली पत्नी आजही लेखकाला खूप साथ देत आहे. इसीच्या दुकानावर आपला उदरनिर्वाह भागवत असत. मुलांच्या शाळेचा खर्चही भागवत असत. कष्टाबरोबरीला आल्यानंतर लेखकाने सामाजिक बांधिलकी म्हणून सामाजिक कार्यात हातभार लावण्यास लेखकाने सुरुवात केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची अखंडित भाव विचारपूर्वक काढली जात लेखक आपल्या कुटुंबाला गावी पेतात. सामाजिक कार्यात झोकून देतात.

लेखक प्रवीण पहुरकर संवेदनशील व्यक्तिमत्त्व असल्यामुळे, वाचन लेखनाची आवड असल्यामुळे अनेक नामवंत लेखकांच्या, लेखकांच्या संपर्कात येऊन स्वतःमध्ये व इतरांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नामदेव ढसाळ व दया पवार अशा अनेक नामांकित साहित्यिकांच्या संपर्कात येऊन आपल्यामध्ये असणारे कौशल्य त्यांनी दाखवून दिले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी त्यांनी केलेले काम महत्त्वाचे आहे. आंबेडकरी चळवळीला उभारी देण्याचे काम त्यांनी केले. गौतम बुद्धांचे आलेले पाकही त्यांनी जपून ठेवले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निकटवर्तीय नानक चंद रत्तू यांच्या कार्यक्रमालाही त्यांना हजर राहता आले. असा अनेक साहित्यिकांचा, कार्यकर्त्यांचा, मान्यवरांचा त्यांचा जवळून संबंध आला आहे. या सर्वांची नोंद त्यांनी यामध्ये घेतली आहे. साहित्यिक ज.वि.पवार यांच्याविषयी बोलताना म्हणतात की, आपल्या वाट्याला जे जीवन आले ते मांडताना त्यांनी लोकशाहीच्या नावाखाली उच्च जातीयांचे मानवी वर्तन कसे घडत असतं यावर प्रकाश टाकला. अशा पद्धतीने प्रवीण पहुरकर जे जीवन जगले तेच त्यांनी यामध्ये प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला दिसून येतो. ते स्वतः आपल्या मनोगतात म्हणतात की, जगण्याचा संघर्ष आठवून, साठवून गोळा करत जगणे मांडत गेलो. आत्मकथन मांडताना जेवढ्या हिंमतीने सांगितले तेवढेच नेटाने मांडत गेलो. उघडे, नागडे होऊन सर्वांसमोर यावे असे वाटताना हा प्रकार स्वतःशी गरिबीशी आलेल्या काही घटना प्रसंगाशी, जातीयता व अंधश्रद्धेशी अशा अनेक घटनांमधून जीवन संघर्ष मांडत लिहीत गेलो. कधी क्षणिक सुख तर कधी भयान कटू अनुभव लिहिल्या दिसत होतो.

अशाप्रकारे प्रवीण पहुरकर यांनी 'पेवुळ' नावाचे आत्मकथन लिहिले आहे. ते ज्या वऱ्हाड प्रांतात वावरले, वाढले, जगले, राहिले तिथल्या म्हणजेच तिथली भाषा त्यांनी यामध्ये मांडलेली दिसते. आलेल्या कडू-गोड अनुभवांच्या आठवणीचे गाठोडे त्यांनी उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून अनेक गोष्टी नवतरुणांना दिशा देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या, प्रेरणा आणि प्रोत्साहन देणाऱ्या आहेत. त्यामुळे विपरीत परिस्थितीशी झुंजलेल्या मानवी मनाला बळ प्राप्त करून देणारे हे आत्मकथन आहे, असे मला वाटते.

- पेवुळ : प्रवीण पहुरकर
- पैठी पब्लिकेशन, २९७/१, आनंद नगर, माळवाडी रोड, हडपसर, पुणे २८
- मुखपृष्ठ : दीपक अघोरे
- पृष्ठे : २०८, ● किंमत : रु. २००
- मो. : ९८९००३६६८३

- मराठी विभागप्रमुख,
कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर,
ता.साक्री, जि.धुळे


# पुरोगामी राजा: छत्रपती राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहू महाराज आणि सामाजिक समता हे समीकरण फार महत्त्वाचे आहे. राजर्षी शाहू महाराज आयुष्यभर सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणि अस्पृश्य, बहुजन समाजाचा उद्धार करण्यासाठी प्रामाणिकपणे लढले. ते एक कृतीशील आणि प्रयोगशील राजे, समाजसुधारक, विचारवंत होते. छत्रपती शिवाजी महाराज सोडले तर अनेक राजांचा इतिहास अन्याय, अत्याचार व जुलमी राजवटीचा आहे. एकाधिकारशाहीचा, हुकुमशाहीचा आहे परंतु छत्रपती राजर्षी शाहू महाराज मात्र याला अपवाद आहेत. हा राजा लोकशाहीचा, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा आहे हे एखादा गादी सोडील पण बहुजन समाजाचा उद्धार करण्याचे कार्य सोडणार नाही या त्यांच्या वक्तव्यावरून लक्षात येते.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या हाती वयाच्या २० व्या वर्षी १८९४ साली सत्ता आली. त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे येताच त्यांनी पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानातील प्रजेच्या हालअपेष्टांची पाहणी केली. संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प, मागासलेला समाज, अंधश्रद्धा, जाती पातीनी दुभंगलेला व जातिवादाने फार पोखरलेला होता. शेकडो वर्षे अस्पृश्य समाज, बहुजन समाज ज्ञान, सत्ता, संपत्ती, शिक्षण अशा अनेक गोष्टींपासून वंचित राहिला होता. चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक शोषण वाढले होते. अस्पृश्य, गरीब, शेतकरी, मजूर यांचे फार मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. सामान्य जनता भयानक दारिद्र्य, अज्ञानाच्या, अंधश्रद्धा, रूढी यांच्या बुडाली होती. शिक्षण क्षेत्रात बहुजन समाज बोटावर मोजता येईल इतकाच होता. पाणी, रस्ते, शेती, व्यापार, कला अविकसित होत्या म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग या रंजल्या, गांजलेल्या लोकांसाठी केला हे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत**

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. शिक्षणाशिवाय सुधारणा होणार नाही म्हणून त्यांनी शिक्षणाला महत्त्व देऊन १९०७ मध्ये 'मिस क्लार्क बोर्डिंग' नावाचे वसतिगृह उघडले. शिक्षणाचा प्रसार, प्रचार व्हावा म्हणून १९१६ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून शाळा, महाविद्यालये, बोर्डिंग, शिष्यवृत्त्या सुरू केल्या. तसे आदेश त्यांनी जारी केले. आजच्या परिस्थितीत आपले राज्यकर्ते शाळा, महाविद्यालये, शिष्यवृत्त्या बंद करत आहेत. हे समाजहित, देशहिताच्या दृष्टीने घातक आहे.



निमित्त

प्रा.डॉ.सतीश मस्के

9423397484

**आरक्षणातून प्रगती**

चातुर्वर्ण्यव्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणावर बोकाळलेली असल्यामुळे आणि प्रत्येकाला जातीनुसार काम वाटून दिले असल्यामुळे अस्पृश्य समाजात प्रगती होत नव्हती. शिक्षण नव्हते. खालच्या वर्गातील माणूस वरच्या वर्गात जाऊ शकत नव्हता. अस्पृश्य लोकांची प्रगती व्हावी, त्यांचे दारिद्र्य दूर होऊन त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्यांचे जीवनमान उंचावले म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा राखून ठेवण्याची क्रांतिकारी घोषणा करून २६ जुलै १९०२ मध्ये लंडनहून आदेश काढून क्रांतिकारी पाऊल उचलले आहेत. ते आरक्षण आज पूर्णपणे भरले जात नाही उलट त्याविषयी गैरसमज पसरविले जाताना दिसतात.

**अस्पृश्योद्धाराचे कार्य**

नोव्हेंबर १९१० सालामध्ये वेदोक्त प्रकरणावरून त्यांना जातीयतेचा अनुभव आला. माझ्यासारख्या राजाबरोबर हे असे वागत असतील तर सामान्य माणसांची काय स्थिती आहे. म्हणून त्यांनी जाती व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करण्याचे ठरविले. छत्रपती शाहू महाराजांचे कार्य संस्थानापुरते मर्यादित नव्हते तर संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांची पकड होती. जाते त्यामुळे अस्पृश्य समाजाचे फार हाल होत होते. माणूस म्हणून त्यांच्याकडे कुणी पाहत नव्हते. विषमतेमुळे त्यांचे जीवन पोखरून निघाले होते. भयभीत झाले होते. राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीच्या लोकांना उपहारगृहे, दुकाने (गंगाराम कांबळे)

दुकाने काढण्यासाठी आर्थिक मदत केली. पाणवठ्यावर लोकांना शिवाशिवीचा प्रथा हिंदा... सार्वजनिक स्थानांची स्वतंत्र करून पुढे जाऊन बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले. अस्पृश्य समाजातील व इतर गरीब समाजातील लोकांना सरकारी नोकऱ्या दिल्या वकिलीच्या सनदा दिल्या. आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न करून त्यांना मान-सन्मानाचे जीवन दिले. आज देशात वाढत असलेली जातीयता, हुकुमशाही ही आजच्या राज्यकर्त्यांनी लक्षात घेऊन शाहू महाराजांचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे.

**राजर्षी शाहू महाराज आणि डॉ आंबेडकर**

छत्रपती शाहू महाराजांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांविषयी खूप आदर आणि अभिमान होता. म्हणून ते स्वतः डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना भेटण्यासाठी मुंबई येथे त्यांच्या घरी गेले. त्यांचा सत्कार केला. त्यांना 'मूकनायक' काढण्यासाठी व इतर शिक्षणासाठी आर्थिक मदत करून माणगाव परिषदेत अस्पृश्य व इतर बांधवांना त्यांचा परिचय

> **राजवैभव थोर असेल; पण मी स्वतःशी वचनबद्ध आहे, ती वचनबद्धता त्या वैभवाहूनही थोर आहे.** - शाहू महाराज

करून देऊन सांगितले की, भविष्यकाळात अस्पृश्योद्धारक म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच असतील. असा मोठ्या मनाचा राजा होता. जे आपल्याला आज विविध क्षेत्रात शोधूनही असा माणूस सापडणार नाही. म्हणूनच त्यांना दलितांचा कैवार घेणारा पाणी मोठ्या दिलाचा राजा असे म्हटले आहे.

**आंतरजातीय विवाहाला मान्यता**

विषमतेच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. १९१८ साली त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देण्यात कायदा केला. स्वतःच्या घरात धनगर घराण्याशी नाते जुळून कृतीत उतरून आपल्या जातीतल्या काही चालीरीतींना म्हणून त्यांनी स्वतः काही विवाह घडवून आणले. विधवा विवाहाला मान्यता दिली. १९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. स्त्रियांचा सन्मान वाढविणारा होता. हेही आज देशात होत असलेल्या स्त्रियांवरील अन्याय अत्याचार आजच्या राज्यकर्त्यांनी सोबत उचलले पाहिजे आहे.

व्यापार, कला, क्रीडा, साहित्य व इतर कलांना मदत छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना व्यापार, कला, नाट्य, संगीत यांविषयीही आवड व आदर होता. व्यापारी क्षेत्रात मदत देऊन सुतगिरण्या कापडगिरण्या काढल्या. राधानगरी धरण अस्तित्वात आणले. शेतीसाठी, शेतकऱ्यांसाठी बंधारे बांधले. अल्लादिया खान यांच्यासारख्या गायकाला बाबुराव पेंटरला आश्रय दिला. नाटक कंपन्या सुरू केल्या.

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिसळणारा, सामान्यांसाठी झटणारा राजा होता. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. स्त्रीया न्याय मिळावा, माणुसकीचे हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरून शाहू महाराजांचे मोठेपण हे लक्षात घ्यावा लागते. आज मात्र आम्ही व आमच्या राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श बाजूला ठेवला आहे. त्यांचे नाव घेऊन आम्हीही त्यांचा आदर्श आहोत म्हणणारे त्यांच्या विचारांचे वागत नाही. मात्र त्यांच्या विचारांना बगल देताना दिसतात. ज्या शाहू महाराजांनी लोकशाही, मूल्य समतेची पुरस्काराला दिसतात, त्या प्रस्थापित लोकांसाठी निर्माण झालेल्या असमतेच्या आज समाजात अस्वस्थता दिसत आहेत. आज समाजात काही देश राज्यकर्ते असमतेला दिसत आहेत. आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी आपल्याही काही योगदान असावे असे वाटते. राजर्षी शाहू महाराजांना कुठल्याही राजकारणीय वाटत नाही पुढे मागचा विचार न करता स्वार्थासाठी, सत्तेसाठी, जातीसाठी, धर्मासाठी राजकारण करणे चालू आहे परंतु माणसांसाठी, माणसांच्या कल्याणासाठी राजकारण करावे लागते हे मात्र त्यांनी राजर्षी शाहू महाराजांकडून शिकायला हवे. त्या पद्धतीचेच आपले मन पुढे घेऊन जायला हवी व समाजाचे हित जोपासायला हवे. त्यांच्या विचारांची, आचारांची व कृतीची आज देशाला गरज आहे. प्रत्येक भारतीयाने त्यांच्या विचाराने कार्य केले तर देशाची प्रगती व्हायला वेळ लागणार नाही.

- मराठी विभागप्रमुख,
कर्मवीर आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब
एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय,
पिंपळनेर, ता.साक्री जि.धुळे



Image

आधुनिक केसरी
01 Sep 2022
https://www.adhunikkesari.com/epaper/news/15563/630f71d918484

# साहित्यिकाचे प्रतिष्ठान



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

स्वतःचे पाच पैसे खर्च न करता लोकांच्या, विद्यार्थ्यांच्या जीवावर गोळा केलेले पैसे आपल्या स्वतःच्या पुस्तक प्रकाशनासाठी वापरायचे, उरलेले पैसे बँकेत टाकायचे आणि त्यावर जे काही व्याज येणार आहे तेवढ्या रकमेचा पुरस्कार देऊन कार्यक्रम करायचा. ही विद्यार्थ्यांची, समाजाची फसवणूक नव्हे काय? दिशाभूल नव्हे काय? विश्वासघातकीपणा नव्हे काय? असे असत्य साहित्यिकांनी करावे का? हे मला पटत नाही. हल्ली साहित्यक अनेक चांगल्या साहित्यिकांचे जीवन कळपं तयार करून उध्वस्त करत आहेत. त्यांच्या हातचे बाहुले जे आहेत त्यांनाच वर उचलत आहेत. नाहीतरी आज-काल समाजात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी प्रतिष्ठानला पैसे देऊनही पुरस्कार मिळवला जातो.वरिष्ठ साहित्यिकांची मर्जी राखली किंवा पुढं पुढं केलं की पुरस्कार मिळतो. ते बाहुलेही खोट्या प्रतिष्ठेपायी त्यांच्या गळाला लागत आहेत.

साहित्यिक म्हटले की त्याच्याकडे समाज एका आदराच्या भावनेने पाहत असतो. समाज साहित्यिकांना प्रचंड मोठ्या प्रमाणावर मान सन्मान देत असतो. तो साहित्यिक माझ्या ओळखीचा असावा, आपण त्याच्याबरोबर मैत्री करावी म्हणून अनेक जण प्रयत्न करत असतात. त्याच्याबरोबर कधी फोटो काढून घेण्याचा प्रयत्न करत असतात. साहित्यिक हा समाजाचा मार्गदर्शक असतो. समाजावर तो आपल्या लेखणीच्या माध्यमातून सुसंस्कार करत असतो. समाजाला तो घडवण्याचा प्रयत्न करत असतो. म्हणून समाज त्याला जीवापाड जपतो, जीव लावत असतो. परंतु साहित्यिकानेही या समाजाच्या प्रेमाला आणि विश्वासाला जागायला हवं. आपल्याकडून समाजाची, माणसांची अवहेलना होणार नाही त्यांचा विश्वासघात होणार नाही याची सतत जपणूक करायला हवी. त्यानं सतत जागृत राहायला हवं. सामाजिक मूल्यांची, जीवन मूल्यांची आणि निती मूल्यांचीही सतत जपणूक त्याने करायला हवी. परंतु हल्ली असे अनेक सुप्रसिद्ध, नामवंत, विचारवंत साहित्यिक आहेत की, समाजाला व्याख्यानाच्या माध्यमातून, लेखणीच्या माध्यमातून भावनिक, आर्थिक, आणि वैचारिक ब्लॅकमेल करून समाजाचा नकळतपणे छळ करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. परंतु समाजाला भावनिकतेमुळे तो साहित्यिक आपल्याला धोका देतो आहे, आपले शोषण आणि दिशाभूल करतो आहे हे कळत नाही कारण ते साहित्यिकाच्या, लेखनाच्या आणि त्यांच्या बोलण्याच्या मोहात तुडुंब भरून गेलेले असतात. चिंब न्हाऊन निघालेले असतात. तो साहित्यिक आपला वापर करून घेतो आहे हेही समाजाच्या व इतर छोट्या साहित्यिकाच्या लक्षात येत नाही. पद्धतशीरपणे व अगदी काटेकोरपणे समाजाच्याही लक्षात येणार नाही याची काळजी तो नामवंत साहित्यिक घेत असतो अन् समाजाला फसवत असतो. त्यांचे भक्तही तसेच अंध असतात. अशाच साहित्यिकांपैकी एका साहित्यिकाने एक प्रतिष्ठान तयार करून समाजामध्ये स्वतःचं एक नाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. नाहीतरी हल्ली असे करण्याची फॅशनच निघाली आहे. जो तो उठतो एखादे प्रतिष्ठान स्थापन करतो. गौरवग्रंथ दुसऱ्याच्या पैशावर काढतो. समाजसेवेच्या नावाखाली अनेकांना पैसे मागतो व त्यामार्फत एखादे चर्चासत्र घेण्याचे व पुरस्कार देण्याचे नियोजन करतो. स्वतः साहित्यिक त्यावरच समाजात प्रचंड मिरवून घेत असतो. खरे तर यामध्ये पैसा मात्र जनतेचा वापरतो व स्वतःचे नाव करून स्वतःची... वाढवून घेतो. हे सर्रासपणे उघड उघड चालू आहे. अशाच त्या साहित्यिकाने प्रतिष्ठान काढल्याचे नामदेवाने फोन करून सांगितले. नामदेव सांगत होता की, यापूर्वी त्या साहित्यिकाचे दोन-तीन पुस्तके प्रकाशित झाली. गौरवग्रंथही काढला. त्यावेळी त्या



साहित्यिकाने त्यांच्या जवळच्या अनेक विद्यार्थ्यांकडून ग्रंथासाठी दहा-दहा हजार रुपये गोळा करून लाखो रुपये गोळा केले. त्यातही काही विद्यार्थ्यांनी हॉलचे पैसे दिले तर कोणी जेवणाचे पैसे दिले तर काहींनी चहापान केले. साहित्यिक गुरुजींनाही दोन लाखांच्या वर पगार होता पण ते मात्र खिशातील पाणी थोडेही हलू देत नव्हते. 'मुह मे राम बगल मे छुरी' असे वागत होते. अनेक विद्यार्थ्यांकडून त्यांनी पैसे गोळा केला. आयुष्यात त्यांनी फुकट कटा कधीच काढला नाही आणि फुकट मदत कुणालाच केली नाही. उलट विद्यार्थ्यांना खूप गोड बोलून वेगवेगळ्या पद्धतीने छळले आणि लुटले. तेच साहित्यिक समाजाचे परिवर्तन करायला निघाले आहेत.

मी म्हणालो, अरे जाऊ दे मग त्यात काय झाले ! करू दे की त्यांना,काही ना काही तरी करतात तरी...

यावर नामदेव म्हणाला, त्यांच्या करण्याला आपली कुठे हरकत आहे. त्यांनी ते काम केलेलं चांगलंच आहे पण स्वतःचे पाच पैसे खर्च न करता लोकांच्या, विद्यार्थ्यांच्या जीवावर गोळा केलेले पैसे आपल्या स्वतःच्या पुस्तक प्रकाशनासाठी वापरायचे, उरलेले पैसे बँकेत टाकायचे आणि त्यावर जे काही व्याज येणार आहे तेवढ्या रकमेचा पुरस्कार देऊन कार्यक्रम करायचा. ही विद्यार्थ्यांची, समाजाची फसवणूक नव्हे काय? दिशाभूल नव्हे काय? विश्वासघातकीपणा नव्हे काय? असे असत्य साहित्यिकांनी करावे का? हे मला पटत नाही. नाहीतरी हल्ली साहित्यक अनेक चांगल्या साहित्यिकांचे जीवन कळपं तयार करून उध्वस्त करत आहेत. त्यांच्या हातचे बाहुले जे आहेत त्यांनाच वर उचलत आहेत. नाहीतरी आज-काल समाजात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी प्रतिष्ठानला पैसे देऊनही पुरस्कार मिळवला जातो.वरिष्ठ साहित्यिकांची मर्जी राखली किंवा पुढं पुढं केलं की पुरस्कार मिळतो. ते बाहुलेही खोट्या प्रतिष्ठेपायी त्यांच्या गळाला लागत आहेत.

मी म्हणालो, ते खरं आहे पण तू काय करणार? आपण काय करू शकतो?

यावर नामदेव म्हणाला की, तुझे म्हणणे ही अगदी रास्त आहे. अशा या समाजद्रोही, दुटप्पी पणाने वागणाऱ्या अशा या लबाड साहित्यिकांचा पर्दाफाश करायलाच हवा. त्यांचा पर्दाफाश होत नाही म्हणून ते असे प्रकार वारंवार करत राहतात. अरे खर त्यांनी असाच आपला अर्धा संसार दुसऱ्याच्या आधारावर चालवला. स्वतःला कधीही दुसऱ्याला चहा पाजण्याचीही झळ लागू दिली नाही. ही वस्तुस्थिती आहे. एकदा का त्यांनी घर सोडले तर चहापाणी, राहणे, खाणे-पिणे सर्व दुसऱ्यावरच अवलंबून. यामध्ये त्यांचं अख्खं आयुष्य निघून गेले.

आधुनिक केसरी
14 Sep 2022
https://www.adhunikkesari.com/epaper/news/16021/6320a90ccadf5



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

# हिंदुस्थान नाही, भारतच...!

आधुनिक केसरी

**आज भारत देशाला मुद्दामहून धर्मीय भावनेतून हिंदुस्थान म्हटले जाते. यावरच राजकारण करून सर्वसामान्य माणसांची मती भडकावून समाजा समाजात भांडणे लावून मतांचे राजकारण केले जात आहे. अमेरिका, जर्मन, इंग्लंड या देशात जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणावर ख्रिश्चन लोक आहेत. चीन, जपान यामध्येही बहुतांशी बौद्ध आहेत. परंतु हे असे असले तरी त्या देशांची नावे धर्मावरून नाहीत.धर्मवाचक नाहीत . सारे जग देशाला 'भारत ' म्हणूनच ओळखते. भारत या शब्दाला इतिहास आहे.मग या देशाला हिंदुस्थान म्हणणे व महाराष्ट्रात जिल्ह्याचे नाव बदलणे आणि त्यांचे हिंदूकरण करणे हे केवळ मतांसाठी राजकारण केले जात आहे.**

आजचे राजकारण इतके गढूळ झाले आहे की, त्यामध्ये निःस्वार्थपणा, स्वच्छपणा आणि पारदर्शीपणा कुठेच दिसत नाही. खरे तर राजकारण हे देशाच्या, समाजाच्या आणि मानवी कल्याणाच्या उन्नतीसाठी करायचे असते. त्यातूनच मानवी कल्याण साधायचे असते. माणसांच्या मूलभूत गरजांची सुविधा उपलब्ध करून देऊन अन्न, आरोग्य(?), उद्योग, शेती, व्यापार व इतर क्षेत्रात भरभराट करायची असते. सत्तेचा उपयोग यासाठी करून देश महासत्ता बनवायचा असतो परंतु असे चित्र कुठेही दिसत नाही. उलट सत्तेचा उपयोग फक्त धर्मासाठी, हिंदुत्वासाठी लोकप्रतिनिधी करताना दिसून येतात. त्यामुळे समाजातील माणसांची माथी भडकवली जातात. समाजा समाजात विषमतेची दरी निर्माण केली जाते. भारतीय संविधानाने एकमेकांना जोडलेल्या माणसांना त्यामुळे तोडले जाते. हे वाईट आहे. आज देशात महागाईने कळस गाठला आहे. सामान्य जनतेला जीवन जगण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो आहे. तरुणांच्या हाताला काम नाही. नोकर भरती बंद आहे. त्याही नोकऱ्या कमी केल्या जात आहेत. उद्योगधंदे बंद पडले आहेत. शेतकरी आत्महत्या करतो आहे. खाजगीकरणाकडे मोठ्या प्रमाणावर वाटचाल केली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे शाळा महाविद्यालय बंद पडत आहेत. खाण्यावरती जीएसटी लावली जात आहे. आरोग्याच्या सोयी कुठेही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केल्या जात नाहीत. त्याही फार महाग आहेत. अशा अनेक गोष्टींनी सामान्य जनतेला राज्यकर्त्यांकडून लुबाडले(?) जात आहे. त्याविषयी कोणताही लोकप्रतिनिधी आवाज उठवताना दिसत नाही त्याविषयी बोलत नाही. उलट राजकारणी, लोकप्रतिनिधी मात्र जनतेला धार्मिक बनवून, त्यांच्या फक्त मतावर डोळा ठेवून हिंदुत्वाच्या नावाखाली त्यांना एक करून देशाची वाट लावताना दिसत आहेत. खरे तर हिंदूच नव्हे तर(?) जनतेला सुविधा मिळणे, त्यांचे रक्षण करणे, त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे महत्त्वाचे आहे परंतु त्याकडे प्रचंड दुर्लक्ष करून, डोळेझाक करून केवळ हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करून दलित, आदिवासी, शेतकरी मुस्लिम यांना टार्गेट करून सामान्य जनतेला दबावाखाली ठेवण्याचे कारस्थान सत्तेत असणारे सरकार करताना दिसत आहे. खरे तर भारताचा विकास हिंदुत्वामुळे किंवा धर्मामुळे होणार नाही. होत नाही. हिंदुत्वामुळे सामान्य माणसाचे जीवनमान उंचावणार नाही किंवा त्यांचे पोट भरणार नाही तर त्यांना विविध सुविधा देणे गरजेचे आहे. या सुविधा देण्याचे कार्य मात्र कोणतेही लोकप्रतिनिधी मनापासून करताना दिसत नाहीत. उलट भारत देश कसा कंगाल होईल, गरीबी जनतेला जास्त कशी येईल, लोकांना जाती, धर्माच्या नावाखाली बांधून गुलाम कसे करता येईल यासाठी सत्तेचा जोरदारपणे उपयोग केला जात आहे. हे भारताचे दुर्दैव आहे असे म्हणायला हरकत नाही. भारताने 26 जानेवारी 1950 पासून संविधान स्वीकारले आहे. आजच्या देशात लोकशाही नांदते आहे. संविधानानाती 'आम्ही भारताचे लोक' म्हणून उल्लेख आहे. संविधान मंजूर करणारे संविधान सभेत सर्वच विविध जाती धर्माची विद्वान मंडळी होती. त्यांनी भारत व भारतीय हे शब्द मान्य केले आहेत. देशाची ओळख आजही भारत म्हणूनच जगासमोर आहे. या देशात विविध धर्माचे लोक राहतात. हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, जैन, ख्रिश्चन असे विविध धर्माचे माणसे गुण्यागोविंदाने(?) राहतात. मग या देशाला हिंदुस्थान कसे म्हणता येईल तरीही काही जात्यंध आणि धर्मांध राजकारणी, लोकप्रतिनिधी भारत देशाला हिंदुस्थान म्हणत असून एकमेकांच्या मनात राग, वैर, द्वेषभावना निर्माण करत आहे. भारतीय संविधानाचे सर्वधर्मसमभाव हे तत्त्व झुगारून देत आहेत. हे अत्यंत चुकीचे आहे. असे म्हटले जाते की, जैन अनुश्रुतीनुसार भगवान ऋषभ देवाच्या ज्येष्ठ पुत्राचे नाव भरत होते. प्रसिद्ध राजा दुष्यंत याचा पुत्र भरत हा चक्रवर्ती राजा होता. या राजांच्या नावावरून आपल्या देशाचे नाव भारत पडले असे म्हटले जाते. हा इतिहासाचा आधार आहे. असे म्हणतात की, जे जे हिंदूचे धर्मग्रंथ आहेत त्यामध्येही हिंदुस्थान हा शब्द दिसत नाही. सिंधू नदीच्या मुखाजवळील सिंधू प्रदेशात राहणाऱ्या लोकांसाठी तो सिंधू शब्द वापरला. सिंधूचा अपभ्रंश हिंदू आहे असे म्हटले जाते. त्यावरूनच हिंदुस्थान हा शब्द वापरला जातो. आज हिंदुत्व नावाच्या शब्दाभोवती देशाचे राजकारण करून विषमता निर्माण करून समाजा समाजामध्ये तेढ निर्माण केली जात आहे त्यामुळे माणुसकी नष्ट होताना दिसत आहे. हे देशाच्या दृष्टीने घातक आहे. आज देशात रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, जात, धर्म, देव, दानव यांचे मोठ्या प्रमाणावर स्तोम माजवून सामान्य माणसाला पुन्हा अज्ञानाच्या खाईत लोटले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, म. जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेला शिक्षणाचा, प्रगतीचा, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचा मार्ग हे आजचे लोकप्रतिनिधी रोखताना दिसत आहेत. सामान्य माणूस संपून टाकण्याचा जणू त्यांनी विडा(?) उचलला आहे असेच दिसते. आज रोज टी.व्ही समोर येऊन आम्ही हिंदुत्वासाठी जगतो आहोत, हिंदुत्वासाठी एकत्र आलो आहोत किंवा भारत नव्हे हिंदुस्थानच असा पुरस्कार केला जात आहे. लोकशाहीचा आधारस्तंभ असणारी वृत्तपत्रे, चॅनेलही त्यांच्या वाईट गोष्टींनाच प्रसिद्धी देताना दिसत आहेत. हेही वाईट आहे. कुणी भोंगे काढायला सांगतात तर कुणी हर घर तिरंगा लावायला सांगतात. सामान्य जनतेच्या उन्नतीसाठी, हितासाठी, मानवी कल्याणासाठी मात्र कुणीही बोलताना दिसत नाही. हे अत्यंत वाईट आहे. त्यांच्या करणी आणि कथनी मध्ये फरक आहे. रोज लोकशाहीची हत्या केली जात आहे.



लोकशाहीची शपथ घेऊन देशाचा गाडा हाकणारे लोकप्रतिनिधी लोकशाहीचे वस्त्रहरण(?) करत आहेत. सामान्य जनतेची फसवणूक करत आहेत. विकासाच्या नावाने दिशाभूल करत आहेत. हे महाभयानक वास्तव आहे. दलित, आदिवासी, भटके विमुक्त, व इतरांची प्रगती भारतीय संविधानाने आणि शिक्षणाने झाली आहे. तीच प्रगती आज अनेकांच्या डोळ्यात खुपत आहे. संविधानाच्या अधिकारामुळे तो समाज लिहू लागला, बोलू लागला, अधिकार आणि हक्क विषयी जागरूक होऊ लागला, आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करू लागला, विविध पदावर पोहोचू लागला, हक्काची आणि न्यायाची भाषा करू लागला हेच नेमके त्यांच्या प्रचंड जिव्हारी लागत आहे. म्हणूनच पुन्हा ते चातुर्वर्ण्यव्यवस्था आणू पाहत आहेत. हे सर्व सुशिक्षित, दलित, आदिवासी,भटके, विचारवंत, लेखक यांनी लक्षात घेऊन भारत घडवण्याचा प्रयत्न करायला हवा. वाईट गोष्टींना विरोध करायला शिकले पाहिजे. अन्याय, अत्याचाराच्या विरुद्ध लढले पाहिजे. अमृत स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा करताना ही कलाकृतीकडे(?) सोयीस्करपणे(?) हर्षे जाहीर केल्यास काळ आपल्याला माफ करणार नाही. ढोंगी, संधीसाधू आणि स्वार्थासाठी राजकारण करून सत्ता हस्तगत करून जनतेची दिशाभूल करणाऱ्या लोकप्रतिनिधींपासून सामान्य जनतेने धडा शिकणे महत्त्वाचे आहे. आम्ही इंग्रजांच्या पारतंत्र्यातून फार मोठ्या कष्टाने, बलिदानाने स्वातंत्र्य मिळवले आहे परंतु आज आमचेच लोकप्रतिनिधी आमचीच माणसे आपल्या इंग्रजांपेक्षाही हीन वागणूक देऊन सर्वसामान्य जनतेचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहेत हे सामान्य जनतेने वेळीच ओळखायला हवे. त्यांना आम्ही आमचा विकास करण्यासाठी देशाचे भवितव्य घडविण्यासाठी मत दिले आहे. निवडून दिले आहे तेच मात्र स्वार्थासाठी, जात, धर्मासाठी, भ्रष्टाचारासाठी, काम करताना दिसताहेत . सामान्य जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. तेही त्यांच्या स्वार्थासाठी, सत्तेसाठी, मंत्री पदासाठी विकले जात आहेत. स्वतःचे अस्तित्व गहाण ठेवत आहेत. संस्कारहीन बनत आहेत. रोज वेगवेगळ्या थापा मारत आहेत. मग हे लोकप्रतिनिधी जनतेचे हित काय साधणार ? त्यांच्याकडून काय शिकण्यासारखे आहे ? त्यामुळे सामान्य जनतेने महागाई कशी दूर होईल, तरुणांना नोकऱ्या कशा मिळतील, मूलभूत सोयी कशा निर्माण करता येतील, शिक्षण, ज्ञान, उद्योग, आरोग्य यांच्या सोयी आपल्याला कशा मिळतील यासाठी लोकप्रतिनिधींना जाब विचारून न्याय मागणे गरजेचे आहे. जातीय, धर्मीय व केवळ फक्त हिंदुत्वाच्या राजकारणात न अडकता देशहित आणि समाज हित साधणे गरजेचे आहे नव्हे काळाची गरज निर्माण झाली आहे. हा देश हिंदुस्थान नाही,भारत आणि भारतच आहे.

आधुनिक केसरी
27 Nov 2022

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर : एक अनुबंध





आधुनिक केसरी
24 Feb 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/23473/63f774e992d79



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

# अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना विषमतेने वागवू नये

आधुनिक केसरी

**दैनिक लोकमत मधील 12 फेब्रुवारी 2023 च्या अंकात पगार वाढ रोखल्याने 'आरपीएफ सबइन्स्पेक्टरची केली हत्या'या शीर्षकाची बातमी वाचली. खरे तर नोकरीत असणारा कर्मचारी हा आपली नोकरी टिकावी, आपला पोटापाण्याचा प्रश्न आहे, घर संसार नीट चालावा, लेकर बाळ आहेत म्हणून तो जीवाचा आटापिटा करून अगदी पद्धतशीरपणे नोकरी करण्याचा आणि टिकवण्याचा प्रयत्न करत असतो. नोकरी म्हणजे काय? नोकरी मिळवण्यासाठी काय काय करावे लागते? किती मेहनत घ्यावी लागते ! किती कष्ट उपसावे लागतात. अनेकांचे उंबर्डे झिजवावे लागतात. हे त्याला चांगलेच माहीत असते. म्हणून अधिकाऱ्याने सांगितलेली सर्व कामे तो इमाने इतबारे करण्याचाही प्रयत्न करत असतो.**

त्यांच्याकडून एखाद्या वेळेला चुकही होत असेल त्यावेळी अधिकाऱ्याने त्याला समजून सांगणे महत्त्वाचे असते. परंतु अधिकारी मात्र अनेक कर्मचाऱ्यांना विषमतेची वागणूक देत असतात. काही मोजक्या त्यांच्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना आपल्या दावणीत घेऊन बसणे, जे जवळची आहेत त्यांना महत्त्वाची कामे देणे, त्यांचा मान सन्मान कसा होईल त्यासाठीच प्रयत्न करणे. जे स्वाभिमानाने राहू इच्छितात, अधिकाऱ्याच्या गुलामगिरीला झुगारून देतात, अधिकाऱ्याची हांजीहांजी करत नाहीत त्यांना मात्र अधिकारी जाणूनबुजून त्रास देताना दिसतात. अधिकारी आपापल्या कार्यालयात नियमाने वागण्याच्या ऐवजी हुकूमशाही पद्धतीने आणि मी म्हणेल तोच कायदा अशा पद्धतीने वागताना दिसतात. त्यामुळे अशा वागण्याचा कर्मचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कर्मचाऱ्यांची त्रास सहन करून करून त्यांची सहनशीलता संपते. मग तो त्या अधिकाऱ्याची तक्रारही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे करतो तरीही त्या अधिकाऱ्याची चौकशी होत नाही. तक्रारीची दखलही वरचे अधिकारी घेत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तक्रारीची दखल न घेणे म्हणजे त्या अधिकाऱ्याला साथ देणे असा त्याचा अर्थ होतो. असे म्हणतात की वरच्या अधिकाऱ्याचाही त्याच्यात म्हणजे त्या भ्रष्टाचारात वाटा असतो. म्हणून तो तक्रार केली तरीही काहीच बोलत नाही. हे खरे आहे की, अनेक अधिकारी पैसे घेऊन कामे करतात. एखाद्याने पैसे दिले नाहीत तर त्याला मात्र प्रचंड त्रास दिला जातो. त्याचे काम केले जात नाही. एवढेच काय तर तक्रार केल्याचा राग मनात धरून पुन्हा अधिकारी त्या कर्मचाऱ्याला त्रास देण्यास, त्याला पत्र देण्यास, इतरांना त्याच्या जवळ जाऊ न देणे, त्या कर्मचाऱ्याला वाळीत टाकणे, त्याचा रजेचा अर्ज मंजूर न करणे, कर्मचाऱ्यांचे पदोन्नती रोखणे, त्याची वेतनवाढ रोखणे, बंद करणे, कार्यालयातील नको ती कामे सांगणे एवढेच काय तर एखाद्याच्या आयुष्याही संपून टाकण्यासाठी ते मागेपुढे पाहताना दिसत नाहीत. अशा पद्धतीने त्रास देण्यास सुरुवात करतो. हे अधिकाऱ्याचे वागणे कर्मचाऱ्याला असह्य होते. जीवघेणा त्रास त्याला सहन होईनासा होतो. विचार करून करून त्याची क्रयशक्ती कमी होते. आपण इतके चांगले वागूनही त्याचा फायदा काय ? हा प्रश्न त्याला सतत सतावत असतो. मग त्यातून हत्यासारखे प्रकार पुढे येतात. असे प्रकार घडणे हे निषेधार्ह आहे. अशा घटनांचा निषेध करायलाच हवा. असे प्रकार घडू नाहीत म्हणून अधिकाऱ्यांनी आपल्या हाताखालचा कर्मचारी हा ही माणूस आहे. त्यालाही मान, सन्मान, प्रतिष्ठा आहे. इतरांप्रमाणे त्यालाही समतेची वागणूक देणे गरजेचे आहे.. हे ओळखून वागणे महत्त्वाचे आहे. अनेक अधिकारी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना तर अत्यंत वाईट वागणूक देताना दिसतात. गाडी धुवायला लावणे, घरचा भाजीपाला आणायला लावणे, [illegible] शेतातले कामे सांगणे असे अनेक प्रकार कार्यालयात घडताना दिसत आहेत. अशावेळी तो कर्मचारीही वैतागून जातो. तो विचार करतो की मी काय शेतातला शेतगडी आहे की घरी काम करणारा कामगार आहे. अशी कमीपणाची भावना त्याच्या मनात निर्माण करण्यास अधिकारी प्रयत्न करताना दिसतात. म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून अधिकाऱ्यांनीही वागायला हवे. वरच्या अधिकाऱ्यांनीही तक्रारीची दखल घेऊन वेळोवेळी या अशा प्रकरणांचा विचार करायला हवा. तरच मग कुठेतरी प्रशासनात सुव्यवस्थित पणा दिसून यायला लागेल. आज प्रशासन व्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणावर सगळ्याच क्षेत्रातील ढासळलेली झाली आहे. कुणाचाच कुणावर धाक राहिला नाही. सर्वसामान्यांचे कामे सरकारी कार्यालयाकडून होताना दिसत नाहीत. त्यांच्या फाईल एका टेबल वरून दुसऱ्या टेबलवर जात नाहीत. अशा अनेक टेबलांचा भार त्या सर्वसामान्य माणसांना सहन करावा लागतो. एवढेच काय वरचा अधिकारी खालच्याला सतत सतत दाबण्याचा प्रयत्न करत असतो. त्यामुळे एकमेकांमध्ये एक द्वेष भावना, वैर भावना निर्माण होताना दिसत आहे. आज काल तर जाती, धर्मांचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर वादळ निर्माण झाले आहे. ते वादळही सरकारी कार्यालय, निम सरकारी कार्यालय, मंत्री, अधिकारी व प्रशासनालाही आले आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होताना दिसत आहेत. न्याय देतानाही त्या जातीय, धर्मीय वादळाकडे पाहिले जाते त्यावरूनच न्याय दिला जातो. एखाद्याचे काम करायचे की नाही हेही त्यावरूनच ठरवले जाते. सांस्कृतिक, शैक्षणिक व इतरही क्षेत्रेही या जातीय, धर्मीय वादळाने प्रचंड पोखरली आहेत. एखाद्याला कार्यक्रमाला बोलवायचे असेल किंवा कुणाला पुरस्कार द्यायचा असेल तर त्याची जात शोधली जाते. ही वस्तुस्थिती मानवतेला काळीमा फासणारी आहे. लोकशाहीला घातक आहे. तरीही मंत्री, अधिकारी, न्यायव्यवस्था यांनी तरी याकडे लक्ष देऊन ही वादळे थोपवायला हवीत पण तेही आता यामध्ये घुसताना दिसत आहेत. त्यांच्याकडूनही न्याय मिळताना दिसत नाही ही गंभीर बाब आहे. आज मोठ्या प्रमाणावर शिकलेली सुशिक्षित माणसेच या भावनेने विचित्र आणि विक्षिप्तपणे वागताना दिसत आहेत. आज-काल सरकारी कार्यालये, संस्था हे अधिकाऱ्यांना कुरण वाटायला लागली आहेत. त्यांना त्यामध्ये जसे चरायचे म्हणजे मनमानी करायची तसे ते करताना दिसत आहेत. कारण त्यांच्या तक्रारी करूनही वरच्या मंत्री, संस्थाचे हात त्यांच्या पाठीवर असतात. त्यामुळे त्यांचे काहीच कुणी बिघडवू शकत नाही. ही भावना त्यांच्यात जास्त बळावते. त्यामुळेच की काय मानवतेची प्रचंड घुसमट होताना दिसत आहे. या भयानक अवस्थेतून आज अनेक सामान्य नोकरदार माणसं वावरताना दिसत आहेत. त्यांच्यासमोर रोजची रोज वेगवेगळी प्रश्न भयानकता घेऊन उभी टाकत आहेत. त्यांना सतत घाबरवले जात आहे. त्यांची अवस्था जिवंत असूनही मेल्यासारखी करून टाकत आहेत. एवढेच काय तर अनेक जण या भीतीने आपली जीवन यात्राही संपून टाकताना दिसत आहेत. ही भयानकता वरचेवर वाढत आहे. त्यामुळे या सर्व भयानकतेचा विचार वरच्या अधिकाऱ्याने, मंत्र्यांनी व प्रशासनाने करायला हवा. तरच सर्वांना योग्य न्याय मिळेल व अशा प्रकारचे प्रश्न घडताना दिसणार नाहीत. नाहीतर येणाऱ्या काळातली नवीन पिढी ही असे काही सहन करण्यासारखी नाही. त्यामुळे ते सहन करणार नाहीत हे अधिकाऱ्याने लक्षात घेऊनच आपले कार्य हे समतेने करायला हवे. त्यातच लोकशाही हित आणि मानव हित आहे.



आधुनिक केसरी
19 Jun 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/29084/[illegible]

# विद्यार्थी संख्येला शासन यंत्रणाच जबाबदार!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9421357484

आधुनिक केसरी

**कुणी विद्यार्थी देता का विद्यार्थी? या शीर्षकाची बातमी आपल्या दैनिक आधुनिक केसरीमध्ये दि.१६ जून रोजी वाचली. प्राथमिक शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या अन् शिक्षकांची धावपळ विद्यार्थी गोळा करण्यासाठी सुरू झाली. हे खरे भीषण वास्तव आहे. प्राथमिक शाळांच्या बाबतीतच विद्यार्थी पटसंख्येचा प्रश्न निर्माण झाला असे नाही तर विद्यापीठांच्या महाविद्यालयामध्येही हीच परिस्थिती विद्यार्थी संख्येबाबत निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रामधल्या अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्येचा प्रश्न निर्माण झाला आहे. या विविध महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी गोळा करण्याकरिता आजूबाजूच्या खेड्यांमध्ये विविध कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देताना दिसतात.**

[illegible]

आधुनिक केसरी
25 Jun 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/...



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

# प्रतिगामी विचारांची चिकित्सा : बा, तथागता !

आधुनिक केसरी

**आंबेडकरी साहित्य क्षेत्रातील एक दमदार आणि कसदार नाव म्हणजे डॉ. म. सु. पगारे हे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने त्यांनी साहित्य,समीक्षा, वैचारिक,काव्य व इतर क्षेत्रातही आपल्या अभ्यासू मांडणीने स्वतःचे अस्तित्व आणि दबदबा निर्माण केला आहे. साहित्य हे मानवतेशी निगडित असायला हवे या विचाराशी बांधील राहूनच त्यांनी त्यांच्या साहित्यातून आणि वाणीतून स्वातंत्र्य,समता,बंधुता, न्याय बुद्धीप्रामाण्य, वैज्ञानिक दृष्टिकोन या मुल्यांची पेरणी अगदी तटस्थपणे,निर्भीडपणे आणि वास्तविकपणे उजागर केलेली दिसून येते. त्यांनी अनेक वृत्तपत्राच्या स्तंभ लेखनातून व विविध ग्रंथांच्या माध्यमातून पुरोगामी म्हणजेच फुले,शाहू ,आंबेडकरी विचारांची पेरणी अगदी शिस्तबद्ध पद्धतीने केली आहे.**

[illegible]




(क्रमशः)

आधुनिक केसरी
02 Jul 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/[illegible]



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397404

# नवीन शैक्षणिक धोरण नसून बहुजनांचे मरण आहे

आधुनिक केसरी

**राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी करण्यासंदर्भात जोरदार चर्चा चालू होती. परंतु त्या संदर्भातील आराखडा मात्र कोणत्याही विद्यापीठामध्ये तयार नव्हता. विषयाच्या संदर्भातील नियोजनही नव्हते. त्यामुळे विद्यापीठातील सर्व व महाविद्यालयातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक गोंधळात पडले होते. नेमके करायचे काय? हा प्रश्न सर्वांनाच पडला होता म्हणून दिनांक १ जून २०२३ रोजी राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात सुकाणू समिती आणि सर्व कुलगुरू यांची सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.**



[illegible]

आधुनिक केसरी
07 Jul 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/30069/64a6ca592dce9

# मतदार राजा, जागा हो... धोकेबाजांना धडा शिकव!

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

**काल, आज आणि यापूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेसाठी जो अनैतिक धुमाकूळ चाललेला आहे. तो पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारा आहे. मतदार राजाला शरमेनं मान खाली घालायला लावणारा, संस्कृतीची मोडतोड करणारा आहे. मानवतेची होळी करणारा आहे. त्याचबरोबर तरुणांना संस्कारहीन, आणि वाईट मार्गाला लावणारा आहे. त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उमटताना दिसतात. त्यामुळेच समाजाचे स्वास्थ्य बिघडत चालले आहे. या समाजाचे स्वास्थ्य बिघडविण्याचे काम या देशातील सध्याची राजकारणी मंडळी करताना दिसत आहे. मतदार राजाही षंढ झाल्यासारखा शांत आहे. त्याची किंमत गाढवापेक्षाही कमी राजकारण्यांनी करून टाकली आहे. गाढवाला बाजारात भाव आहे पण मतदार राजाला भाव नाही.**

मतदार राजाला सारे फुकट असावे वाटते. दारू, बाटली, मटन पार्टी वर किंवा हजार पाचशे रुपयांवर तो सर्रास विकला जाऊ लागला आहे. अनेक खोट्या आश्वासनांना व आमिषाला बळी पडून तो लाचार, भ्रष्टाचारी बनला आहे. सुशिक्षितही गप्पच आहेत. अनैतिक राजकारण्यांचे उंबरठे झिजवताना आणि तळवे चाटताना दिसत आहेत. त्यामुळे स्वतःचे अस्तित्व गमावून बसले आहेत. याचाच परिणाम लोकप्रतिनिधी वाटेल तिकडे तोंड खुपसू लागले आहेत. त्यांची सगळ्याच क्षेत्रात मनमानी चालू आहे. मतदार राजाला ते गृहीत धरून मतदार राजाचीच वाट लावत आहेत. म्हणून आता तरी मतदार राजा जागा झाला पाहिजे आणि त्यांनी लोकप्रतिनिधींना आपली जागा दाखवून दिली पाहिजे.

आज राजकारणात जे काही घडत आहे ते पाहून सामान्य माणूस हतबल झाला आहे. राजकारणात सत्तेसाठी लोकप्रतिनिधी जे काही वागतात, बोलतात, लाचार होतात, पक्ष बदलतात अन् लोकशाहीची पायमल्ली करतात हे फार वाईट आहे. त्यामुळे सामान्य माणसांचे जगणे, फिरणे, राहणे मुश्किल झाले आहे. तो रोज जीव मुठीत घेऊन जगतो आहे. पक्ष बदलताना मतदाराच्या, विचारधारेचा ते काडीमात्रही विचार करताना दिसत नाहीत. त्यांच्या या अशा दल बदलू पक्ष बदलू भूमिकेमुळे मतदार राजा, कार्यकर्ते व काही आमदारही अडचणीत येताना दिसतात. कुणाबरोबर जावे हे कळेनासे होते. मतदारांनी ज्या पक्षाला, विचार धारेला बघून लोकप्रतिनिधींना मतदान केलेले असते त्या मतदारांचा, कार्यकर्त्यांचा विचार न करता विचार न घेता त्यांची माती करून टाकताना दिसतात. म्हणजे असे नितीहीन, संस्कारहीन आणि भूमिकाहीन लोकप्रतिनिधी जनतेची काय सेवा करणार ? हा प्रश्न सर्वांनाच सतावत राहतो. तेही म्हणजे लोकप्रतिनिधीही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा फुटबॉल प्रमाणे इतरांना वापर करू देतात हेच वाईट आहे. खरे तर मतदारांना व सर्व सामान्य लोकांनाही वाईटाला चांगलं आणि चांगल्याला वाईट म्हणण्याची सवय लागलेली दिसते आहे. आज समाजात जिकडे तिकडे वाईट कृत्य करणाऱ्यांनाच मोठे मानलं जातं त्यांना मोठेपण दिले जातं. हे खरे तर मतदारांना आणि सर्वसामान्यांना कळायला हवे. राजकारण्यांनी महाराष्ट्रात हिंदुत्व हिंदुत्व करून जातीय, धर्मीय भेद निर्माण केल्यामुळे आणि सतत करत असल्यामुळे सामान्य माणूस भयभीत झाला आहे. रोज हेच लोकप्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन त्यांच्या विचारांची पायमल्ली करून जनतेची, सामान्य माणसांची फसवणूक आणि दिशाभूल करत आहेत. हे भयानक वास्तव समाजात दिसत आहे. चांगला विचारशील, कुठोकटी, मानवतावादी माणूस भयभीत झाला असून गुन्हेगारी क्षेत्रातील माणसं उघड माथ्याने फिरत आहेत. त्यांनाच बदाम काजू सारखा भाव आला आहे. रोज खून, मारामाऱ्या, बलात्कार, होताना दिसत आहेत. उघड उघड शस्त्रे घेऊन रस्त्या रस्त्यावर दहशत माजवली जात आहे. अनेकांचे जीव नाहक घेतले जात आहेत. त्यांची कुठेच मोजदाद नाही. अधिकाऱ्यांकडूनही प्रचंड नोकर दारांचे शोषण चालू आहे. अधिकारी भ्रष्टाचारात गुंतले आहेत. त्यांची सरकारकडे तक्रार केली तरीही दखल घेतली जात नाही उलट त्याची पाठ राखण केली जाते. त्यांना क्लीन चीट दिली जाते. कुठल्याही अधिकाऱ्यांवर सरकारचा वचक नाही. अधिकाऱ्यांकडून सामान्यांच्या तक्रारींची दखल नाही. त्यामुळे तेही या भ्रष्टाचारांच्या सागरात पोहून आणि तरून निघत आहेत. कारण त्यांना आम्ही निवडून दिले आहे तेच लोकप्रतिनिधी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी, सत्तेसाठी लाचार बनत आहेत. स्वतःची संपत्ती शाबूत ठेवण्यासाठी सर्वसामान्य माणसांच्या मुंड्या मोडत आहेत. न्यायालयाकडूनही न्याय मिळताना दिसत नाही. ज्या शेतकरी, मतदारांनी, सुशिक्षित बेरोजगारांनी, खेड्यापाड्यातील गरिबांनी, शेतमजुरांनी, दलित, आदिवासी, ओबीसी, भटक्या विमुक्तांनी, नोकरदारांनी लोकप्रतिनिधींना म्हणजेच आमदार, खासदारांना मत देऊन निवडून आणले आहे. त्या आमदार, खासदार लोकप्रतिनिधींकडून या सर्व जनतेच्या विविध भावना आहेत. त्यांचे विविध प्रश्न आहेत. त्यांच्या विविध जीवनाच्या समस्या आहेत. त्या सर्वांच्या स्वप्नांवर नांगर फिरवण्याचे काम हीच मंडळी करताना दिसत आहे. कोणाचेही प्रश्न सोडवण्यामध्ये शासनाला म्हणजे लोकप्रतिनिधींना रस नाही. उलट या जनतेला भावनिक बनवून आपल्याकडे खेचून शब्दांच्या मोहजाळ्यात अडकवून त्यांचे जीवन कसे बेचव करता येईल. त्यांना गुलामीत कसे ठेवता येईल हेच प्रतिनिधी करताना दिसत आहेत. लोकप्रतिनिधींची संपत्ती अमाप आहे. भ्रष्टाचार करून मिळवलेली ती संपत्ती आहे. ती संपत्ती सांभाळण्यासाठी ही लोकप्रतिनिधी नावाची दुकानं विकली जात आहेत. कुणीकडून कुणाकडेही कोणत्याही पक्षात सैरभैर पळताना दिसत आहेत. पुन्हा वरून नीलाजऱ्यासारखे आम्ही किती इमानी आहोत हे दाखवताना दिसत आहेत.

नीतिहीन लोकप्रतिनिधी शहाणपणाच्या गप्पा मारताना दिसत आहेत. खरे तर जनतेने म्हणजेच मतदार राजाने हे ओळखायला हवे. ज्या मतदार राजाच्या जोरावर निवडून येऊन त्यांच्याच नरडीचा घोट घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. तरीही मतदार राजा मेल्यासारखा गप्पगुप पडून राहतो. तो बोलत नाही, आवाज उठवत नाही म्हणूनच त्यांचे फावले आहे. या मतदार राजांनी जातीच्या, धर्माच्या, नातेवाईकांच्या भिंती बाजूला सारून अशा भ्रष्टाचारी, जातीय लोकप्रतिनिधींना आपले करण्याऐवजी त्यांना दावणीच्या खड्ड्याकडे बाजूला फेकून देऊन इमाने इतबारे जनतेची सेवा करणाऱ्या लोकप्रतिनिधींना निवडून द्यायला हवे. कोणत्याही जातीय, धर्मीय सरकारच्या छाताडावर पाय देऊन महागाई कमी करायला लावली पाहिजे, खाजगीकरण थांबवायला लावले पाहिजे, नोकर भरती सुरू करायला लावली पाहिजे, शाळांची संख्या वाढवायला पाहिजे. गुणवत्तेचं शिक्षण द्यायला हवे. ते सोडून देऊन मतदार राजाही कुत्र्यासारखा त्यांच्या तुकड्यावर, मटन पार्टीवर जगताना दिसतो आहे. म्हणूनच ही देशातील वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधी देवा, धर्माचे रस्ते दुरुस्त करत आहेत. तिथपर्यंत रेल्वेची व्यवस्था करत आहेत. पण सर्वसामान्य मतदार राजाच्या आरोग्याच्या सोयीसाठी दवाखाने, तरुणांसाठी शाळा, महाविद्यालये बांधताना दिसत नाहीत. महागाई कमी करताना दिसत नाहीत. मंत्रालयात, संसदेत सत्यनारायण करणे, एकाच धर्माची पूजा करून जाती जातीत, धर्मा धर्मात भेद निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. आज देशात ज्या जातीय, धर्मीय दंगली उसळत आहेत त्यालाही हे सरकार जबाबदार आहे. गोमूत्र शिंपडून ती जागा पवित्र करण्याचा प्रयत्न करून समाजामध्ये विषमतेचे विष पेरण्याचा, लोकांमध्ये जातीयतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्नही सरकारकडूनच होताना दिसत आहे. त्याला केवळ हे लोकप्रतिनिधी आणि सरकारच कारणीभूत आहे. कारण या लोकप्रतिनिधी कडून सामान्य माणूस कार्यकर्ते शिकण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांचेच संस्कार समाजात वावरत असतात. मग सरकारमधील लोकप्रतिनिधी असे जर विषमतेच्या संस्काराने, जातीयतेच्या संस्काराने बरबटलेले असतील तर कार्यकर्त्यांवर आणि समाजावर कुठले चांगले समतेचे आणि मानवतेचे संस्कार येणार ? आज समाजात वावरताना प्रत्येक माणूस एकमेकांकडे पाहत असताना संशयाने पहात आहे. कार्यालयात व गावागावात वागतानाही मनात जातीय द्वेष बाळगूनच वागताना दिसत आहे. जातीय, धर्मीय चष्म्याने पहात आहेत. जातीय, धर्मीय विष आणि द्वेष मनात घेऊन जगणारे अनेक जण समाजातील सामान्य माणसाचे जीवन उद्ध्वस्त करताना दिसत आहेत. त्यांना भीती किंवा धाक उरलेला नाही. कारण शासन शंभर टक्के आपल्या पाठीशी उभे राहणार आहे. ही खात्री त्यांना वाटत आहे. म्हणून प्रत्येक जण आपले जीवन दबकून जगत आहे. भीतीने जगत आहे. दहशतीत जगत आहे. खरे तर जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींने समाजातील सर्व जनतेचे प्रश्न सोडवून त्यांचे कल्याण कसे करता येईल, सर्वांना सर्वधर्मसमभाव याप्रमाणे कसे वागवता येईल हे पाहणे गरजेचे असते तरीही हे लोकप्रतिनिधी कल्याण करताना तर कधीच दिसत नाहीत. समता निर्माण करताना दिसत नाहीत. उलट जातीवाद, धर्मवाद, विषमतेची पेरणी जोरकसपणे करताना दिसत आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे समाजातील वातावरण बिघडले आहेत. ज्या भारतीय संविधानाने सर्वसामान्य माणसाचे जगणे सुखकर केले आहे, नवजीवन दिले आहे.

त्या संविधानाची पायमल्ली हे लोकप्रतिनिधी पावलोपावली करताना दिसत आहेत. भारतीय संविधानाचे नाव घेऊन रोज संविधानाच्या विरोधी वागताना दिसत आहेत. म्हणून सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेला लोकप्रतिनिधी जर मतदार राजाची कदर करत नसेल त्याला वाटेल तेव्हा तो पक्ष बदलत असेल तर त्याला त्याची जागा दाखवून द्यायलाच हवी. असे नितीहीन, विश्वासघात करणारे लोकप्रतिनिधी जर आपण निवडून दिले तर या देशाचे लवकरच वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. समाजासाठी झटणारे, समाजात समता निर्माण करणारे, सर्वसामान्य माणसांचे, शेतकरी, शेतमजूर, दिन, दलित, आदिवासी, भटके अशांचे प्रश्न जाणून घेणारे लोकप्रतिनिधी असले पाहिजेत. हे भान लक्षात ठेवूनच आपण आपल्या अमूल्य मताचा उपयोग केला पाहिजे. एका मताची किंमत म्हणजेच लाखोंचे जीवन घडवू शकते एवढी आहे ती केवळ फक्त हजार पाचशेच्या किंवा मटण पार्टी, दारूच्या बाटली एवढी नाही. हे मतदाराने कायम लक्षात ठेवून जागृत असले पाहिजे. माणसाला पशु बनवण्याची प्रक्रिया सध्या जोरदारपणे चालू आहे ती हाणून पाडण्यासाठी मतदार राजा आता तरी जागा हो. पुरोगामी विचारांची, समतेची, मानवतेची क्रांती करण्यासाठी सज्ज हो. एक चांगला माणूस बनणे महत्त्वाचे आहे.

आधुनिक केसरी
15 Aug 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/32196/64da38e806319

# स्वातंत्र्यदिन साजरा करताना



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ साली भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्ष पूर्ण झाली. स्वातंत्र्य दिन भारतभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. खरंतर स्वातंत्र्य हे अनेक लाखो लोकांच्या बलिदानातून मिळाले आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त केले. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात देशाविषयी आणि स्वातंत्र्यवीरां विषयी कृतज्ञतेची भावना आहे. ती असली ही पाहिजे. त्याचबरोबर भारताने या ७५ वर्षात नानाविध क्षेत्रात नेत्रदीपक अशी कामगिरी केल्याची दिसून येते. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, रस्ते, वीज अशा विविध क्षेत्रात भारताने खूप प्रगती केली आहे.**



लोकमत

# प्राचीन व ब्रिटिशकालीन पिंपळनेर

प्रा. डॉ. सतीश मस्के, पिंपळनेर

पिंपळनेर हे महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील ऐतिहासिक परंपरा आणि पुरावा असणारे गाव आहे. पांजरा नदीच्या किनारी वसलेले, महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या सरहद्दीवरील फार मोक्याचे आणि निसर्गरम्य परिसरातील गाव आहे. पिंपळनेर मधील जुनी मंदिरे,शिल्पावशेष, इंग्रजांच्या काळातील चर्च, शासकीय विश्रामगृह, वनविभागाचे कार्यालय यावरून आजही इतिहासाची साक्ष पटते. प्राचीनत्वाच्या काही खाणाखुणा आजही पिंपळनेर येथे दिसून येतात. पिंपळनेरचा आजूबाजूचा भाग पुराणात, महाभारतात वर्णन केलेला आहे असे म्हटले जाते. खांडववनचा एक भाग होता. महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या सांस्कृतिक सरहद्दीवरील पिंपळनेर हे एक मोक्याचे आणि महत्वाचे गाव असल्याचेही दिसून येते. पिंपळनेरच्या पूर्वेला महादेवाचे जागृत स्थान गांगेश्वर (चिकसे) आहे. पश्चिमेला पानखेडा गावात एक ऐतिहासिक गढी आहे. पांझरा नदी, लोणेश्वर महादेवाचे मंदिर, कवी रत्नाकरची समाधी, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांचे निवासस्थान आहे. दक्षिणेस जैन धर्मियांचे (मांगीतुंगी) तीर्थक्षेत्र जैन धर्मियांचे पहिले तीर्थंकर भगवान ऋषभदेव यांची 108 फूट उंच मूर्ती साकारण्यात आलेली आहे. त्याचबरोबर मांजरीच्या दक्षिणेस डोंगराच्या पायथ्याशी हेमाडपंथी देवळाचे अवशेष असून त्यामध्ये खोदकाम केलेले दगडी का पाठवतात. आजूबाजूला भिल्ल, कोकणी, मावची, पावरा, असा आदिवासी लोकांची वस्ती व पाडे आहेत.

पिंपळनेरला पूर्वी पिंपळेश्वर म्हटले जायचे. या गावात पिंपळेश्वर महादेवाचे मंदिर आहे. हे मंदिर गावातील लोकांचे श्रद्धा केंद्र आहे. इथे भाविकांची खूप मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून येते. मंदिराच्या आजूबाजूला पिंपळाचे झाडेही मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. त्यामुळे पिंपळाच्या झाडावरून पिंपळेश्वर असे नाव पडल्याचे सांगितले जाते. पुढे पुढे पिंपळेश्वर नावावरून पिंपळनेर असे नाव पडल्याचे सांगितले जाते.

**ब्रिटिश कारकिर्दीत तालुक्याचे ठिकाण**

ब्रिटिशांच्या काळात पिंपळनेर हे तालुक्याचे ठिकाण होते. त्यावेळी पिंपळनेर येथे खूप मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असे. पावसामुळे पिंपळनेर येथील वातावरण, हवामान येथील नागरिकांच्या आरोग्यास हानिकारक होत चालले होते. आजूबाजूच्या डोंगरामुळे, दाट झाडीमुळे खूप मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असे. पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसे. त्यामुळे पिंपळनेर येथील जनजीवन विस्कळीत होत होते व नागरिकांमध्ये रोगराईचेही प्रमाण वाढलेले दिसून येत असल्यामुळे पिंपळनेर वरून तालुक्याचे ठिकाण साक्री येथे १९०८ साली हलविण्यात आले आहे.

**स्वातंत्र्य सैनिकांचा वारसा**

भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी या गावातील अनेकांनी पारतंत्र्यातून मुक्तता मिळविण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनात उडी घेतलेली दिसून येते. महात्मा गांधीजींच्या असहकाराच्या चळवळीत चले जाव च्या चळवळीतही पिंपळनेर गाव अग्रणी असल्याचे दिसून येते.१९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामात ज.दा.कोठावदे, शिवराम नथ्थू वाणी, वामन ओझरकर, यशवंतराव कृष्णाजी सूर्यवंशी, शा.न. गुजराथी, रा.वा. पाटील, वि.तु.गुजराथी, शंकर बोळे, मोतिराम संपत चौधरी, राजाराम महाराज देशपांडे आदींनी भाग घेतल्याचे दिसून येते. इंग्रजांचे पोलिस स्टेशन जाळून टाकल्याची ही नोंद दिसते. परिणामी त्यातील काही स्वातंत्र्य सैनिकांना कारावासीही भोगावा लागला आहे. म्हणजे स्वातंत्र्य चळवळीसाठी पिंपळनेरमधील आशा अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी देह झिजविल्याचे दिसून येते.

**तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी**

पिंपळनेर हे गाव मराठी लेखक, कोशकार, सामाजिक शास्त्राच्या अभ्यासक संशोधक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मूळ गाव म्हणजेच जन्मगाव पिंपळनेर हे आहे. ही पिंपळनेरकरांसाठी भूषणावह अशी गोष्ट आहे. अशा या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जन्म २७ जानेवारी १९०१ साली पिंपळनेर मध्ये झाला. त्यांनी ज्या घरात जन्म घेतला त्या घराची वास्तू आजही पिंपळनेरला पाहावयास मिळते. त्यांच्या वडिलांचे नाव बाळाजी व आईचे नाव चंद्रभागा असे होते. तर्कतीर्थांचे प्राथमिक शिक्षण पिंपळनेरला झाले. पुढील शिक्षणासाठी ते वयाच्या १४ व्या वर्षी सातारा जिल्ह्यातील वाई या ठिकाणच्या प्राज्ञपाठ शाळेत दाखल झाले.१९23 साली कलकत्त्याच्या शासकीय महाविद्यालयातून तर्कतीर्थ ही पदवी घेतली. मुल्हेरच्या पंडित घराण्यातील सत्यवतीशी त्यांचा विवाह झाला. कायदेभंग चळवळीत त्यांनी भाग घेतला होता व त्यांना कारावासही झाला होता असे सांगितले जाते.१९५४ साली दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची ही ते अध्यक्ष होते.१९६० साली ते महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळाचे अध्यक्ष होते.१९७३ साली त्यांना संस्कृत पंडित म्हणून व पद्मभूषण म्हणून भारत सरकारने १९७६ साली गौरविले आहे. अशा विचारवंताची पिंपळनेर ही भूमी आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रंथालय**

पिंपळनेर येथे १९२१ साली लोकमान्य टिळक यांच्या नावाने आयुर्वेदाचार्य वेणीमाधव जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रंथालय सुरू केले. पूर्वी गावात पाच ठिकाणी ग्रंथालय होती. गावातील तरुणांनी एकत्र येऊन लोकमान्य टिळकांच्या प्रथम स्मृतीदिनी हे एक ग्रंथालय सुरू केले. या ग्रंथालयात केसरी व मराठा हे वृत्तपत्र यायचे. या ग्रंथालयात येणारे वृत्तपत्र वाचून अनेक तरुणांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळत असे. धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व्ही.ईश्वरन यांनी १९४० साली ग्रंथालयाकरीता जागा उपलब्ध करून दिली.१९७५ साली या ग्रंथालयास 'ब' दर्जा प्राप्त झाला होता. आजही या लोकमान्य टिळक ग्रंथालयात नानाविध विषयावरील ग्रंथ मिळतात. आज या ग्रंथालयात एकूण २४,००० हजार ग्रंथ असल्याचे ग्रंथपाल भूषण कोठावदे यांनी सांगितले.

पिंपळनेर पासून २० किमी अंतरावरील शेंदवड मांजरी नावाच्या गावातील एका डोंगराच्या कपारीत पांझरा नदीचा उगम झाल्याचे दिसते. या नदीमुळे आणि लाटीपाडा व जामखेली धरणामुळे पिंपळनेरचा व साक्री तालुक्याचा कायापालट झाल्याचा दिसून येतो. पांझरा नदीचे १३८ किमी लांबीचे खोरे असून त्यातील पाणी शेतीस वापरण्यात येते. पात्रात दगडी बंधारे बांधून त्यावर फड पद्धतीने शेतीस पाणीपुरवठा आजतागायत केला जातो. खानदेशात यादवांची सत्ता होती. त्यांनीही या फडसिंचन पद्धतीस प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर मलिक राजा फारुकीनेही शेती उत्पादन वाढविण्यावर भर दिला होता. पाणी पुरवठ्याच्या सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या. या पात्रातील दगडी बंधाऱ्याची माहिती १४ व्या शतकापासून मिळते.१८१८ मधील इंग्रज अधिकारी (जिल्हाधिकारी) जॉन बिग्जने शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या बंधाऱ्याची पाहणी केली असता १८७ प्रमुख बंधारे आढळून आल्याचे दिसतात. १८८७ पर्यंत ४० बंधारे चांगल्या स्थितीत असल्याचे खानदेश गॅझेटियरमध्ये पहावयास मिळते. अशा या बंधाऱ्यामुळे शेतीचा विकास झाला. अनेक गाव विकसित झाली व उत्तम बाजारपेठेचे केंद्र म्हणून पिंपळनेर कडे बघू लागले. ती पद्धत आजही दिसून येते.

## साहित्यिकांचा पदस्पर्श

पिंपळनेरची भूमी अनेक मान्यवरांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. १४ फेब्रुवारी १९२७ मध्ये महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी यांनी लोकमान्य टिळक ग्रंथालयास भेट देऊन लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे उद्घाटन केले. त्याचबरोबर त्यांनी एका ठिकाणी उभे राहून लोकांना मार्गदर्शनही केले होते ते ठिकाण आज गांधी चौक म्हणून नावारूपाला आले आहे.५ जून १९३५ रोजी माजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद, १४ मार्च १९४० रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर, २३ ऑगस्ट १९५८ साली आचार्य विनोबा भावे, न.चि.केळकर , लक्ष्मणशास्त्री जोशी, भाऊसाहेब हिरे, बाबूभाई मेहता,वि.वा.शिरवाडकर,चि.वि.जोशी, चंद्रकांत वर्तक, यु.म.पठाण, सिंधुताई सपकाळ आदी अनेक साहित्यिकांनी या ग्रंथालयास भेटी दिल्या आहेत. त्यांच्या हस्ताक्षरातील नोंदी आजही वाचावयास व पाहावयास मिळतात. त्याचबरोबर क्रांतीसिंह नाना पाटील हेही पिंपळनेरला स्वातंत्र्य चळवळी निमित्ताने येऊन गेल्याचे सांगितले जाते. त्यांच्या नावानेही नाना चौक पाहावयास मिळतो आहे.

**शासकीय विश्रामगृह**

पिंपळनेर मध्ये आजही इंग्रजांनी बांधलेले १९०१ सालचे विश्रामगृह चांगल्या स्थितीत पाहावयास मिळते आहे. आजही याच विश्रामगृहाचा आधार शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी घेताना दिसतात. याच विश्रामगृहाच्या शेजारी इंग्रजांनी घोड्यासाठी बांधलेले घर (पागा) व टांग्यासाठी बांधलेले घर दिसून येते आहे.

इंग्रजांनी पिंपळनेरमध्ये एक चर्चही बांधलेला आहे. या चर्च च्या शेजारी त्यांचे विश्रामगृही बांधलेले आहे.१९२२ साली बांधलेल्या या विश्रामगृहात मात्र कुणाचीही ये-जा दिसत नाही. त्यावेळी इंग्रजांनी विद्यार्थ्यांसाठी बांधलेले वसतीगृहही इथे पाहावयास मिळते. आज मात्र इथे गुड शेफर्ड नावाची इंग्रजी माध्यमाची शाळा भरत असून परिसर रमणीय आहे.

इंग्रजांनी पिंपळनेर मध्ये एका दवाखान्याची ही निर्मिती केली होती. तिथे पूर्वीचा भुईकोट किल्ला असल्याचेही सांगितले जाते. तटबंदी, उध्वस्त अवशेष व बुरूज पूर्वीच्या वैभवाची कहाणी सांगताना आजही दिसतात. नंतर त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र बऱ्याच काळ होते आता मात्र तिथे महाराष्ट्र शासनाचे अपर तहसील कार्यालय झाले आहे.

**वनविभाग कार्यालय**

पिंपळनेरच्या आजूबाजूचा परिसर हा झाडांचा, जंगलांचा आहे. त्याची देखभाल चांगली व्हावी या दृष्टिकोनातून इंग्रजांनी १९१० साली या कार्यालयाची स्थापना केल्याचे दिसून येते. हे वास्तू आजही चांगल्या स्थितीत असून अधिकाऱ्यांचे कार्यालय व राहण्याचे ठिकाणही चांगले असल्याचे दिसून येते.

**कवी रत्नाकर यांची समाधी**

पिंपळनेर पासून अगदी दोन-तीन किमी अंतरावर असलेल्या लाटीपाडा (पानखेडा) धरणात कवी रत्नाकर यांची समाधी दिसून येते. रत्नाकर हे मूळचे कळवण तालुक्यातील चंडीपुरचे रहिवासी. त्यांचे आडनाव सदावर्ते असून ते मैत्रायन शाखेचे भार्गव ब्राह्मण होते. इंग्रजांचा वकील कर्नल नौरीस सुरतेस असणाऱ्या औरंगजेबास भेटण्यासाठी पिंपळनेर नवापूर मार्गे जात असताना पिंपळनेरच्या परिसरात एक साधू पुरुष पाहिल्याचे नौरीस ऐम्बसी टू औरंगजेब' या ग्रंथात लिहून ठेवले आहे. कवी रत्नाकर यांनी 23 पेक्षा जास्त ग्रंथ लिहिल्याचे सांगितले जाते.'दीपरत्नाकर'हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ आहे.

**बडोदेकर सयाजीराव गायकवाड यांची आठवण**

स्वातंत्र्यपूर्व काळात पिंपळनेर हे गाव बडोदेकर श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या सरकारच्या अधिकारात होते. त्यावेळी बडोदेकर श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी येथील विठ्ठल मंदिरास पालखी दिली आहे. याच पालखीतून भाद्रपद महिन्यात होणाऱ्या सप्ताहात विठ्ठल रुक्मिणीची मिरवणूक काढली जाते.

इंग्रजांकडून पिंपळनेरच्या तांदळाची तारीफ पिंपळनेर व आजूबाजूचा आदिवासींचा पश्चिम पट्टा तांदळासाठी आजही फार प्रसिद्ध आहे. इंग्रजांचा वकील नौरीस पिंपळनेर नवापूर मार्गे सुरतेला जात असताना इथला तांदूळ त्यांनी पाहिला होता. त्या सुवासिक तांदळाचे वर्णन त्यांनी आपल्या 'नौरीस ऐम्बसी टु औरंगजेब' या ग्रंथात करून ठेवले आहे. त्याचबरोबर सम्राट अकबराचा मुलगा दानियल इ.स.१५९९ मध्ये पिंपळनेर पासून जवळ असलेल्या नवापूरच्या गढीत मुक्कामास होता तेव्हा पिंपळनेरच्या तांदळाची तारीफ त्याच्या अखबार नवीसाने दरबारी लेखकाने करून ठेवली आहे.

**नामसप्ताहाची परंपरा**

पिंपळनेर चा परिसर हा धार्मिक मनोवृत्तीचा आहे. त्यामुळे या गावात खंडोजी महाराजांच्या समाधीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. खंडोजी महाराज यांच्या समाधीच्या देखभालीसाठी, दीप नैवद्यासाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी मंदिरास जमीन इनाम करून दिल्याचे सांगितले जाते. यामध्ये कत्तल की रात मध्ये रात्रभर विविध सोंगे काढली जातात.

**मंदिरे व मशिद**

प्राचीन परंपरा असलेली अनेक मंदिरे पिंपळनेर मध्ये आहेत. गणेश मंदिर, विठ्ठल मंदिर, एकविरा मंदिर, मुरलीधर मंदिर, बालाजी मंदिर ही प्रमुख मंदिरे आहे. अशी लहान मोठे एकूण ३२ मंदिरे असल्याचे बोलले जाते. त्याचबरोबर पिंपळनेर मध्ये मुस्लिम बांधवांच्याही काही गल्ल्या आहेत.त्यांना नमाज पढण्यासाठी तीन मशिदही आहेत.

आधुनिक केसरी
29 Aug 2023
https://www.adhunikkesari.com/epaper/news/32952/64ec641e3fc0a

# झंझावात : प्रा.बाबा हातेकर एका लढवय्याची कहाणी


आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. 9423197484

शिक्षित संघटित व्हा आणि संघर्ष करा या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने अनेकजण भारावले. अनेक जणांनी शिक्षणाची कास धरली. शिकलेले तरुण संघटीत होऊ लागले आणि अन्याय,अत्याचाराच्या विरुद्ध संघर्ष करू लागले. शिक्षण घेऊन जो कोणी जिथे पुढे नोकरी करत असेल तिथेही हा आंबेडकरी विचार मांडू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची रुजवणूक समाजाकडे करू लागले. अगदी प्रामाणिकपणे तो विचार घराघरात पेरू लागले. हा विचार पेरणे किंवा रुजवणे जातीयवाद्यांच्या पुढे अवघड होते. आव्हान होते. आंबेडकरी विचाराने शिकलेला किंवा नोकरदार तरुण जातीयवाद्यांच्या डोळ्यात सतत सलत असे, तरीही त्याला न जुमानता आपल्या समाजावर, तरुणांवर, नोकरदार माणसावर कोणी जातीय भावनेतून हल्ला केला, अन्याय अत्याचार केला तर त्याला उत्तर देणारे धाडस करणारे अभ्यासू लढवय्ये आंबेडकरी सैनिक, काही तरुण पुढे आले.

[illegible]




[illegible]